बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | रविवार,दि.१४जुलै २०२४ | वर्षे३रे | अंक३५०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

इस्रायलच्या हवाई हल्ल्यात ७१ जणांचा मृत्यू



# गाझामध्ये मोठा नरसंहार!

## मोस्ट वॉन्टेड दहशतवाद्याला केलं होतं लक्ष्य

## वरीष्ठ हमास कमांडर जिथे लपले तिथेच हल्ला

## तोफखाना अन् ड्रोनने विस्थापित लोकांना लक्ष्य केले

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

गाझाच्या खान युनिस येथे इस्रायलने हल्ला केला असून यामध्ये किमान ७१ जणांचा मृत्यू झाला असून २५० हून अधिक नागरिक जखमी असल्याचे वृत्त आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. हमास संचलित गाझा सरकारने या हल्ल्याचे वर्णन मोठा नरसंहार असे केले असून मृतांमध्ये नागरी आपत्कालीन सेवा सदस्यांचा समावेश आहे.

या भीषण हल्ल्यात नागरी आपत्कालीन सेवाच्या सदस्यांच्या १०० हून अधिक लोक मारले गेले आहेत, असं हमाससंचालित गाझा सरकारी मिडिया कार्यालयाने एका निवेदनात म्हटलं आहे. तर, हमासचा लष्करी शाखा प्रमुख मोहम्मद देईफला इस्रायलने सैन्याने लक्ष्य केलं होतं, असंही इस्रायल सैन्याने म्हटलं आहे. एपीने दिलेल्या वृत्तानुसार, हमासचा आणखी एक महत्त्वाचा अधिकारी राफा सलामा यांनाही या हल्ल्यात लक्ष्य करण्यात आलं होतं.दक्षिण इस्रायलमध्ये ७ ऑक्टोबर २०२३ मध्ये झालेल्या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार आणि इस्रायल-हमास युद्धाची सुरुवात करणारा मोहम्मद देईफ हा अनेक वर्षांपासून इस्रायलच्या मोस्ट वॉन्टेड यादी होता. त्यातच आज इस्रायलकडून हल्ला करण्यात आला आहे. गाझा आरोग्य मंत्रालयानुसार अनेक जखमी आणि मृतांना जवळच्या नासेर रुग्णालयात नेण्यात आले आहे.

### आतापर्यंत हजारो नागरिकांचे जीव गेले

हल्ला पूर्वनियोजित हल्ला असल्याचंही म्हटलं जातंय. तसंच, या ठिकाणी हल्ला होणार असल्याची सूचना मे महिन्यापासून दिली जात होती. अखेर, इस्रायलने हल्ला केला. तसंच, इस्रायलला केला जात असलेला शस्त्रपुरवठा थांबवावा, असं आवाहन युके सरकारलही करण्यात आली आहे. दरम्यान, या हल्ल्यातील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. गेल्यावर्षी ७ ऑक्टोबर २०२३ पासून या हल्ल्याला सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत हजारो नागरिकांचे जीव गेले आहेत.

### वरिष्ठ कमांडर लक्ष्यित

इस्रायली सैन्याने या हल्ल्याबद्दल जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे की, जिथे दोन वरीष्ठ हमास कमांडर लपले होते तिथेच हल्ला केला आहे. हवाई हल्ल्याचे ठिकाण झाडे, अनेक इमारती आणि शेड यांनी वेढलेले एक खुले क्षेत्र होते. हमासने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, इस्रायली लढाऊ विमाने, तोफखाना आणि ड्रोनने विस्थापित लोकांना लक्ष्य केले. या हल्ल्यात निर्दोष आणि असुरक्षित नागरीक मारले गेले आहेत.

# दिंद्रुड परिसरात कोटींचा गुटखा पकडला

**दणका : दिंद्रूड अन् स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड पोलीस हद्दीत तेलगावहून परळी कडे जाणाऱ्या संशयित कंटेनरला बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी सायंकाळी चार वाजे दरम्यान भोपा पाटी वर पकडले असता जवळपास एक कोटी रुपयांचा राज निवास पानमसाला गुटखा आढळून आला. दिंद्रुड पोलीस स्टेशनला कंटेनर जप्त करण्यात आले असून पुढील कारवाई शनिवारी रात्री उशिरापर्यंत चालू होती.



अधिकृत असे की, गोपनीय माहितीच्या आधारे तेलगावहून परळी कडे जाणाऱ्या एका कंटेनरला स्थानिक गुन्हे शाखेचा दोन पथकांनी पकडत दिंद्रुड पोलीस स्टेशनला आणले असता जवळपास ७५ लाख रुपयांचा राजनिवास पानमसाला नावाचा गुटखा व अंदाजे २५ लाख रुपये किमतीचे कंटेनर असा एक कोटी रुपयांचा मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला असून शनिवारी रात्री उशिरापर्यंत कारवाई चालू होती. बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान चांद शेख व दिंद्रूड पोलीस स्टेशन चे सपोनि अण्णाराव खोडेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय तुपे,सुशांत सुतळे,पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खरात,पो उप निरीक्षक राजाभाऊ राठोड,पो. हे.कॉं. शेख नसीर अशोक दुबाले कैलास ठोंबरे राजू पठाण मारुती कांबळे अर्जुन यादव वाहन चालक गणेश मराडे, अतुल हराळे पान २ वर...

# पालकमंत्र्यांना पाप फेडावे लागणार!

**खा.बजरंग सोनवणे : अंबाजोगाईत सत्कार समारंभ**



अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

सत्ता पक्षांचे नेते , धनशक्ती , सत्तेचा पुरेपूर वापर , दबाव तंत्राचा वापर करून देखील इथे जनतेने सत्तांध शक्तीचा पराभव करून सर्व सामान्य शेतकऱ्याचे पोरग खासदार केले , मी होऊच नये म्हणून जीवाचे रान आणि आकाश पाताळ एक करताना पालकमंत्र्यांनी जातीवाद आणि दबाव सारखे पाप केले जे विधानसभेत फेडावे लागेल असा दम भरताना सहा मतदार संघात तुतारीचा निनाद होणार असल्याचे सांगितले . नव्या खासदाराचा सत्कार करताना अंबाजोगाई प्रचंड नटली होती , प्रचंड गर्दी उत्साहात बजरंग सोनवणे यांच्या सत्काराला समाज एकवटला .

पालकमंत्री यांनी जे पाप लोकसभेला केले आहे,ते पाप येणाऱ्या विधान सभेला फेडावे लागणार आहेअसे म्हणताना बजरंग सोनवणे यांनी कालच्या सभेत जोरदार प्रहार चढवला .येणाऱ्या काळामध्ये बीड जिल्ह्यामध्ये आपल्या महविकास आघाडीचे सर्व आमदार निवडून अनायचे आहेत,आपण मला खासदार केले अत्ता आपल्या जिल्ह्याचे राहिलेले काम करण्यासाठी कामे करून कशी घ्यायची ते मी बगतो,अश्या शैलीत आपले भाषण केले,माझ्या सहित जिल्ह्यातील सर्व जनतेला त्रास दिला,त्याचा हिशोब अत्ता विधान सभेला होणार आहे,जाती जाती मध्ये तेढ निर्माण करण्याचे काम बंद करा, पान २ वर...



# बीडमध्ये शिवसेना सदस्य नोंदणी अभियान

**पडघम : शिवसेनेची महत्वपूर्ण जिल्हा बैठक**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब, यांच्या आशीर्वादाने शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने तसेच मराठवाडा संपर्क नेते अर्जुनजी खोतकर साहेब, जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. विजय पाटील, विधानसभा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या सूचनेवरून दि. १३ जुलै रोजी शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालय जालना रोड, बीड येथे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पदाधिकाऱ्यांची जिल्हा बैठक पार पडली. या बैठकीमध्ये जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक तथा सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना शिवसेना सदस्य नोंदणी अभियाना विषयक मार्गदर्शन केले. बीडमध्ये शिवसेना सदस्य नोंदणी जास्तीतजास्त प्रमाणात करा असे आवाहन केले. याबरोबरच अनिलदादा जगताप यांनी आपल्या सर्वांचे नेते तथा महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री पान २ वर...

# परिश्रमातून यशाचे शिखर गाठता येते

**डॉ.योगेश क्षीरसागर : बीडमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव**

बीड/पुण्यभ प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेताना पालक, गुरुजनांचे संस्कार न विसरता समाजात प्रतिमा निर्माण करावी. भविष्यात नवगण व विनायक युवक कल्याण संस्थेच्या माध्यमातून आणखी शाळा, महाविद्यालये सुरू करण्याचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन संस्थेचे सहसचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. तसेच, विद्यार्थ्यांनी कागदावर पडलेल्या गुणांना महत्त्व न देता रक्तातल्या गुणांना वाव देण्याची गरज आहे. विद्यार्थीनी प्रामाणिकपणे अभ्यास करत राहावे. आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले.



येथील नवगण शिक्षण संस्था, विनायक युवक कल्याण संस्थेत शिक्षण घेऊन १० वी, १२ वी, नीट, एम.एच.टी.सी.ई.टी., जे.ई.ई. परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसह पालकांचा सत्कार सोहळा शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयातील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर क्रीडा संकुल व सांस्कृतिक सभागृहात शनिवारी (दि.१३) पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. योगेश क्षीरसागर तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशांत कदम हे बोलते होते.व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष किशोर काळे, ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तमराव पवार, पान २ वर...

### असा राबविला उपक्रम

डॉ.योगेश क्षीरसागर, प्रशांत कदम यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थांना स्मार्ट वॉच, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या समारंभासाठी नवगण शिक्षण संस्था, विनायक युवक कल्याण संस्थेचे सर्व संचालक, सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक वर्ग उपस्थित होते.

# मुंबईत ध्रुव राठीवर गुन्हा दाखल

**कारवाई : बिर्लांच्या विषयीची वादग्रस्त पोस्ट भोवली**

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रसिद्ध युट्यूबर ध्रुव राठीच्या विरोधात महाराष्ट्र नोडल सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांची मुलगी अंजली हिच्याबद्दल खोटी पोस्ट अपलोड केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल झाला आहे. अंजलीने यूपीएससी परीक्षेला न बसताच उत्तीर्ण झाल्याची माहिती ध्रुव राठीच्या एक्स अकाऊंटवरून देण्यात आली होती. पोलिसांनी भारत न्याय संहिता कायद्याखाली अब्रुनुकसानीचा गुन्हा दाखल केला आहे. जाणुनबुजून एखाद्याची बदनामी करत सामाजिक शांततेला धक्का पोहोचवण्याबद्दल हा गुन्हा दाखल झाला आहे. तसेच माहिती व तंत्रज्ञान कायद्यानुसार पान २ वर...



### गुन्हा दाखल झाल्यानंतर पोस्ट डिलीट

ध्रुव राठीवर गुन्हा दाखल झाल्यानंतर पॅरोडी अकाऊंटवरून पुन्हा एकदा पोस्ट टाकण्यात आली आहे. महाराष्ट्र सायबर पोलिसांनी पाठविलेली नोटीस पोस्टवर अपलोड करत नव्या पोस्टमध्ये म्हटले की, महाराष्ट्र सायबर सेलने सांगितल्यानुसार मी अंजली बिर्लाशी निगडित सर्व पोस्ट डिलीट करत आहे. मला सत्य माहीत नव्हते. त्यामुळे मी आंधलेपणाने इतरांच्या पोस्ट कॉपी करून त्या इथे अपलोड केल्या होत्या. त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो, अशा शब्दात माफी मागितली आहे.

# बेबंदशाहीचे 'पूजा'पाठ!

स्पर्धा परीक्षांवर सर्व लक्ष केंद्रित करणारे या देशातील बुद्धिमान, कष्टकरी इत्यादी इत्यादी विद्यार्थी आणि त्यांच्या यशाच्या स्वप्नरंजनात मशगूल पालक या उभयतांनी पूजा खेडकर यांचे शतश: आभार मानायला हवेत. यश मिळविण्यासाठी अभेद्या, दुष्प्राप्य वगैरे समजल्या जाणाऱ्या या परीक्षांच्या आणि नंतरच्या अधिकारी निवड प्रक्रियेचा बुरखा या पूजाबाईंनी टराटरा फाडला असून त्यांच्या या एकहाती कर्तबगारीची नोंद देशाच्या प्रशासकीय इतिहासात सुवर्णाक्षरांत केली जाईल, यात तिळमात्रही शंका नाही. एखादी व्यक्ती व्यवस्था, नीती-नियम आदींस खुंटीवर टांगून पोलादी परीक्षा यंत्रणेचा लौकिक कसा मातीमोल करू शकते आणि असे करून मजबूत मानली जाणारी यंत्रणा किती कचकड्याची आहे हे दाखवून देऊ शकते याचे या पूजाबाईंइतके उत्तम उदाहरण शोधूनही सापडणार नाही. अर्थात त्यांच्या या अभूतपूर्व यशामागे बुद्धिमान, प्रामाणिक कष्ट केल्याशिवाय यश मिळत नाही अशी वदंता असणाऱ्या परीक्षांचे पार मातेरे करण्यात समाज म्हणून आपल्या निष्क्रिय सहभागाचा वाटा आहे हे नाकारता येणार नाही, हे खरे. अलीकडेच आपण वैद्याकीय अभ्यासक्रमासाठी अत्यंत चुरशीच्या मानल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षांचे उत्तम वाटोळे केले. ते पूर्ण व्हायच्या आत या पूजाबाईंच्या सौजन्यामुळे स्पर्धा परीक्षांचा क्रम लागला. आयएएस, आयपीएस, आयएफएस इत्यादी परीक्षांत यशस्वी होणे या देशातल्या प्रत्येक तरुण-तरुणीचे स्वप्न असते आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी शिक्षणाच्या बाजारपेठा दुथडी भरून वाहत असतात. या परीक्षांत यशस्वी होण्यासाठी किती कष्ट करावे लागतात, दिवसाचे २०-२० तास अभ्यास करावा लागतो, मुलाखतीचे तंत्र आत्मसात करावे लागते, सामान्यज्ञान उत्तम असावे लागते, चतुरस्त्रा व्यक्तिमत्त्व विकासाचा ध्यास असावा लागतो इत्यादी इत्यादी कथाकहाण्यांनी घरोघरीचे शैक्षणिक वातावरण भारलेले असते. तथापि या परीक्षा, त्यांची निवड पद्धती प्रत्यक्षात कोणत्याही ग्रामसिंह शिक्षणसम्राटाच्या संस्थेतील प्रवेश प्रक्रियेप्रमाणे 'मॅनेज' करता येऊ शकते किंवा काय असा प्रश्न या पूजनीय पूजाबाईंची कृती दर्शवते. त्यांच्या या कर्तृत्वासाठी स्पर्धा परीक्षांसाठी रक्त आटवणाऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या त्यांच्या ऋणात राहतील.यातील कोणाकडून काहीच होत नसेल तर बेबंदशाही चार पावलांवर असते. पूजा खेडकर प्रकरणाचा हा सांगावा आहे. ही बेबंदशाहीची पूजा अशीच सुरू राहिली तर काय होते याची उदाहरणे आसपास भरपूर आहेत. त्यावरून काही शिकायचे नसेल तर आपल्याइतके करंटे आपणच ठरू.

# शेतकरी बहिणी जास्त लाडक्या असायला हव्यात



सर्व महिलांच्या कल्याणाचा मार्ग एकच आहे असे समजणे चुकीचे आहे. एसटी बस उपलब्ध नसणाऱ्या शेतमजूर महिला गाडीला लोंबकळत कामावर जातात. त्याच वेळी लाखभर पगार असणारी महिला अर्ध्या तिकिटात ऑफिसमध्ये जात असते ही विसंगती धोरणकर्त्यांनी लक्षात घेतली पाहिजे

शेतकरी कोणाला म्हणावे? शेती असणाऱ्याला. शेतात सर्वांत जास्त राबतो कोण? अर्थात शेतकरीच! पण मग लावणी, खुरपणी, सुगी करणे इ. कामे कोण करते, असा प्रश्न केला की शेतीच्या चर्चेत महिलांचा समावेश सुरू होतो. नगर जिल्ह्यातील एका दिवंगत नेत्याने भर सभेत असे विधान केले होते की महिलांनी ठरवले की उद्यापासून आम्ही गाय पालनाविषयी काहीच काम करणार नाही, तर पुढच्या आठवड्यापर्यंत सर्व गायी बाजारात विक्रीसाठी नेल्या जातील. अर्थ एवढाच की दुग्ध व्यवसाय हा पूर्णपणे महिलांच्या कष्टांवर उभा आहे. माझी नव्वद वर्षांची आजी सांगते की ती पाच-सात वर्षांची असताना शेंगा फोडणीचे काम करत होती. थोडी मोठी झाली आणि खुरपणी करू लागली. कळण्याच्या वयात शेतात जे जे काम महिला करू शकत होत्या ती सर्व कामे तिला करावी लागली. जशी परिस्थिती सुधारत गेली त्याप्रमाणे तिच्या भावाचे काबाडकष्ट कमी होत गेले. मोट जाऊन इंजिन आले, बैलाऐवजी ट्रॅक्टरने मशागत- पेरणी होऊ लागली. परंतु खुरपणी आणि कांदा-भाजीपाला लावणी ही कामे महिलांकडे कायम राहिली. म्हणजे महिलांचे काबाडकष्ट कमी होत नाहीत. ते कमी करण्यासाठीचे फारसे संशोधनसुद्धा होत नाही. महिलांचे मोठे योगदान शेती क्षेत्रात असूनही त्याची दखल घेतो कोण?प्रकल्प कामाविषयी अनेक शेतकरी महिलांशी संवाद होत असतो. प्रकल्पात निवड झालेल्या महिलांना सर्व शेती नियोजन स्वत:च करायचे असते. त्यांच्याशी संवाद साधताना विचारले की, आपल्यासाठीचे प्रकल्पातील सर्वांत सुखद अनुभव कोणते होते? उत्तर मिळाले, शेती नियोजन करण्याचे स्वातंत्र्य! शेतकरी म्हणून प्रशिक्षण शिबिराला उपस्थित राहण्याची संधी आणि शेतीविषयी उपक्रम-बैठकीचे मिळणारे निमंत्रण! ज्या कुटुंबात शेतकरी आत्महत्या झाली आहे त्या कुटुंबाविषयीच्या विविध पैलूंचे अनेक अभ्यास झाले आहेत. त्यातून एक गोष्ट लक्षात येते की, आत्महत्या झालेल्या बहुतांश कुटुंबांतील महिला त्याच शेतीमध्ये आपली गुजराण करत आहेत. आपल्यावर बेतलेल्या परिस्थितीचे झालेले आकलन आणि सुचलेले उपाय यातून त्यांनी शेती पद्धती बदलेली आहे. रोजचा घरखर्च भागविण्यापुरते उत्पन्न मिळण्यासाठी कुणी शेळ्या-कोंबड्या घेतल्या आहेत, काही महिलांनी आपल्या घरच्या गरजा भागतील एवढी अन्नधान्ये पिकवून राहिलेल्या जमिनीवर नगदी पिके घेतली आहेत. थोडक्यात, जोखीम कमी करणारी शेती पद्धती त्यांनी स्वीकारली आहे. हे कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रम किंवा धोरणामुळे झालेले नाही.असे म्हटले जाते की शेतीचा शोध महिलांनी लावला आणि शेतीची मालकी प्रस्थापित करण्यासाठी म्हणून लग्न व्यवस्था अस्तित्वात आली. आज परिस्थिती बदलली आहे.

महिलांचे शेतीमध्ये योगदान मोठे आहे, परंतु त्याची दखल त्या खातेदार झाल्याशिवाय घेता येत नाही. त्या खातेदार व्हाव्यात यासाठीचे धोरण राजकीयदृष्ट्या परवडत नाही, अशी पुढाऱ्यांची धारणा आहे. शेतकाम करणारी महिला म्हणून तिला वेगळा आवाज नाही. त्यामुळे तिची अशी म्हणून मागणी पुढे येत नाही. त्याचा परिणाम म्हणजे तिच्यासाठी म्हणून ज्या योजना आहेत त्या आहेत त्या सर्व महिलांना असणाऱ्या म्हणजे मातृत्व, विवाह, विधवा आणि शिक्षणविषयीच्या योजना. या योजनांविषयी चर्चा करताना आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे ऐन तिशीत गर्भ पिशवी काढणारी ऊस तोड कामगार महिला, शेतकरी नवरा नको म्हणणाऱ्या मुलीची भूमिका, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची विधवा पत्नी आणि दहावी उत्तीर्ण होऊनही पुढे न शिकलेल्या ग्रामीण भागांतील मुली. ज्याप्रमाणे शेतकरी तितुका एक असे समजणे चुकीचे ठरते आहे. त्याचप्रमाणे सर्व महिलांच्या कल्याणाचा मार्गसुद्धा एकच आहे असे समजणे चुकीचे ठरणार आहे. एस.टी. बस उपलब्ध नसणाऱ्या शेतमजूर महिला गाडीला लोंबकळत कामावर जातात. त्याच वेळी लाखभर पगार असणारी महिला अर्ध्या तिकिटात ऑफिसमध्ये जात असते ही विसंगती लक्षात घेतली पाहिजे. ज्याप्रमाणे थोडे कमकुवत असणारे मूल त्याच्या काळजीपोटी आईचे जास्त लाडके असते. त्याचप्रमाणे आज बेदखल असणारी शेतकाम करणारी महिला कधीतरी कुणाची लाडकी होईल अशी अपेक्षा करूयात!

# धोंडराई रोहयोतील घोटाळा तपासण्यासाठी तीन समित्या

## अजित देशमुख : या समित्यांवर आपला विश्वास नाही



बीड (प्रतिनिधी) जन आंदोलनाने धोंडराई तालुका गेवराई येथील ग्राम पंचायतच्या चालू असलेल्या अनागोंदी कारभारा संदर्भात आणि काही कामात संदर्भात आवाज उठवल्यानंतर पंचायत समिती, गेवराई जागी झाली असून घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी तीन वेगवेगळ्या समित्यांची स्थापना केली आहे. मात्र या समित्यांवर आपण समाधानी नसून वरिष्ठ पातळीवरून आपण समित्या नियुक्त करायला लावू, असे जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांनी या समित्या नियुक्त केल्या आहेत. या समस्यांमध्ये त्याच तालुक्यात कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे या समित्या तक्रारीला किती न्याय देतील ? हा प्रश्न उपस्थित होत आहे. तरी देखील या समित्यांचा अहवाल आल्यानंतर त्याचा आपण अभ्यास करू. जर चुकीच्या अहवाल आला तर अहवाल देणाऱ्यांवर देखील कारवाई करण्याची मागणी करू, असे ही देशमुख यांनी म्हटले आहे.

या समित्यांमध्ये कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग, स्थापत्य अभियांत्रिकी, सहाय्यक विस्तार अधिकारी पंचायत, प्रभारी सहाय्यक लेखा अधिकारी, सहायक कार्यक्रम अधिकारी, ऑपरेटर, तांत्रिक सहाय्यक, अशा वेगवेगळ्या लोकांच्या नियुक्ती आहेत. दुर्दैव असे की, कोणते मुद्दे तपासायचे आहेत, निवेदनात कोणते मुद्दे आहेत, हेच या समितीला गटविकास अधिकाऱ्यांनी सांगितले नाही. त्यामुळे कारभार कशा पद्धतीने चालू आहे, हे स्पष्ट दिसते.

त्याचप्रमाणे धोंडराई येथील हा घोटाळा म्हणजे शासनाला दिशा देण्याचे एक काम आहे. त्यामुळे या ठिकाणी कोण काम करत आहे ? अधिकारी कोण आहेत ? याच्याशी आपल्याला काही देणे घेणे नसून धोरणात्मक बदलासाठी एक नमुना म्हणून धोंडराई सह अन्य काही ठिकाणच्या बाबी आपण शासनास सांगणार आहोत. अनेक बाबीवर काम नियमबाह्य रीतीने केलेले आहेत. या बाबी गटविकास अधिकाऱ्यांच्या अधिनस्त काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना माहित आहेत.

त्याचप्रमाणे अन्य खात्यांना देखील या बाबी माहीत आहेत. इतकेच नाही तर जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदे मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील या बाबी माहीत आहेत. त्यामुळे या ठिकाणी एक उच्चस्तरीय समिती नियुक्त करून त्याद्वारे चौकशीची मागणी आपण या तीन समित्यांचा अहवाल आल्यानंतर करणार असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना ही एका कायद्यावर आधारित योजना आहे. या कायद्यात अनेक शिक्षा करण्याच्या तरतुदी आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी अधिकारी दोषी सापडतील, त्या ठिकाणी त्यांच्यावर कारवाई होईल. यात कसलीही शंका नाही. मात्र त्यासाठी लढा देण्याचे काम करत असल्याचेही ड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# पान एक वरून

**दिंद्रुड परिसरात कोटींचा...**

यांनी ही कारवाई केली.कंटेनर चालक विद्या राम शामलाल रा.निनवाया अचनेर, आग्रा, उत्तर प्रदेश यास दिंद्रुड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

**बीडमध्ये शिवसेना ...**

दिवसरात्र काम करत आहेत, आपले जनतेप्रती असणारे कर्तव्य पार पडत आहेत. यामुळे आपण देखील सर्वांनी त्यांच्या कार्याला प्रेरित होऊन पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी योगदान द्यायला हवं. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यापेक्षा सर्वाधिक सदस्य नोंदणी अभियान बीड जिल्ह्यात राबविण्यात यायला हवे असे जिल्हप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मार्गदर्शन सूचना केल्या. दरम्यान परमेश्वर डाके यांची शिवसेना शेतकरी सेनेच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. या बैठकीसाठी जिल्हप्रमुख सचिन भैय्या मुळूक यांच्यासह शिवसेना, महिलाआघाडी, युवासेना, पदाधिकारी तथा लोकप्रतिनिधी, जिल्हा संघटक, जिल्हा समन्वयक, विधानसभा प्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहर प्रमुख, उपतालुकाप्रमुख, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख व सर्कलप्रमुख यांची उपस्थिती होती.

**पालकमंत्र्यांना पाप...**

मनोज दादाना मला शिव्या देतात त्यांना पाठीशी कोण घालतंय,त्यांना आवर घाला, असा इशाराही खासदारांनी अप्रत्यक्ष पालक मंत्र्यांना लगावला,आलेल्या सर्व निवेदनाच्या कामाचा पाठपुरावा करून मार्गी लावण्याचे काम करणार आहे, जिल्हा परिषदेच्या शाळेच्या दर्जा वाढवण्याचे काम करू, हारवेस्टर व ऊस तोडणी मजुरांचा दर सारखाच कशा होईल याचा ही प्रयत्न करू,बीड जिल्ह्यातील शेतकऱ्याचे दरडोई उत्पन्न वाढवण्याचे काम मला करायचं आहे, काटा मारून कारखाना चालवणारी अवलाद माझी नाही,आणि मी कटा मारून कारखाना चालवत असेल तर पालकमंत्र्यांनी ३ वर्ष ऊस माझ्या कारखान्याला दिला कसा असा खोचक सवाल केला, आपण वयाने छोटे आहात,टीका करत असताना विचारून करा,माझे अत्ता सुरू झाले आहे,आपले संपत आले आहे, याचाही विचार आपण करावा, असे ठणकावत बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्र्यांना उद्याच्या राजकारणात दोन हात करण्याचे आव्हान दिले .केवळ जातीचे राजकारण करून जर कुणाला सत्ता मिळवायची असेल तर इथले सामान्य मतदार हा कावा पूर्ण होऊ देणार नसल्याचे म्हटले .

**परिश्रमातून यशाचे...**

पिपल्स एज्युकेशन संस्थेचे सचिव मुस्ताक अन्सारी, संस्थेच्या संचालिका डॉ.सारिकाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, विद्यार्थी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष शाकेर झकेरिया, शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्षा डॉ. दिपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली नवगण शिक्षण संस्था, विनायक युवक कल्याण संस्थेचा नावलौकिक होत आहे. या संस्थेतून विविध परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप देण्यासाठी दरवर्षी सत्कार समारंभ सोहळा आयोजित केला जातो. सामाजिक जाणीव ठेऊन विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिल्याने प्रेरणा मिळत असते. संस्थेतून दरवर्षी जवळपास २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात उच्च पदावर काम करत आहेत. आजच्या डिजिटल स्मार्ट युगात शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर कोणत्या क्षेत्रात जावे हे पालकांपेक्षा विद्यार्थांना अधिक माहिती आहे. विद्यार्थांना चांगले काय, वाईट काय हे समजावून सांगणे खूप महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी चिकाटी, मेहनत, शिस्त या माध्यमातून यशाचे शिखर गाठावे, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या. पुढे बोलताना प्रशांत कदम म्हणाले की, विद्यार्थांनी आपल्यातील कलागुणांना वाव देऊन आपले छंद जोपासले पाहिजेत. नवगण शिक्षण, विनायक युवक कल्याण संस्थेच्या माध्यमातून जवळपास ७०० कुटुंब आपले उदरनिर्वाह करत आहेत. त्यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर हे सर्वात मोठे कुटुंब प्रमुख आहेत. विद्यार्थांना शिक्षणाबरोबर आपल्या जीवनाचा अर्थ कळला पाहिजे हीच चांगल्या संस्थेत शिकल्याची लक्षणे असल्याचे मत प्रशांत कदम यांनी व्यक्त केले.

**मुंबईत ध्रुव राठीवर...**

आगळीक करणारे विधान केल्याबद्दलही गुन्हा दाखल झाला आहे.ध्रुव राठी हा युट्यूबवर चांगलाच प्रसिद्ध आहे. राजकीय, विश्लेषणात्मक व्हिडीओ ध्रुवकडून तयार केले जातात. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्याने भाजपा आणि केंद्र सरकारच्या विरोधात काही व्हिडीओ टाकले होते. त्या व्हिडीओंना प्रसिद्धी मिळाली होती. भाजपा समर्थकांकडून ध्रुव राठीला अनेकदा लक्ष्य करण्यात येत असते. ओम बिर्ला यांच्या मुलीविषयी टाकलेली पोस्ट ही थेट ध्रुव राठीच्या वैयक्तिक अकाऊंटवरून गेलेली नाही. ध्रुव राठी पॅरोडी या नावाने असलेल्या अकाऊंटवरून सदर पोस्ट करण्यात आली होती.

# वीज उपकेंद्राचा दूरध्वनी कोणीही उचलेना !

## समस्या : पंधरा गावातील वीज ग्राहक त्रस्त

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

वीज ग्राहकांच्या सेवेसाठी उपलब्ध सुविधेचा दूरध्वनी वीज उपकेंद्रात कोणीही वीज कर्मचारी उचलून प्रतिसाद देत नसल्याने जरंडी सह पंधरा गावातील वीज ग्राहक त्रस्त झाले आहेत

महावितरणने जरंडी वीज उपकेंद्रातून ग्राहकांना वेळोवेळी वीज पुरवठ्याची माहिती मिळावी यासाठी फिडर निहाय सोशल मीडिया हे समूह तयार केले आहे परंतु प्रत्येक जवळ मोबाईल नसल्याने मोबाईल वरील संदेश प्रत्येक ग्राहकांला पोहचत नाही त्यासाठी जरंडी उपकेंद्राचा एक मोबाईल क्र ७८७५४०५३१५ ,हा ग्राहकांच्या सुविधे साठी मोबाईल क्र कार्यान्वित करण्यात आला आहे या क्रमांकावर शेती पपं सह गाव पुरवठ्या ची माहिती जाणुन घेण्यासाठी अथवा एखादी अपघात घटना झाल्यास त्यासाठी शेतकरी व ग्राहक या नंबरवर संपर्क करतात परंतु हा क्र जरंडी च्या वीज उपकेंद्रातून कोणताही कर्मचारी उचलून प्रतिसाद देत नाही त्यामुळे शेतकऱ्यांची व वीज ग्राहकांच्या अडचणी वाढल्या आहे जरंडी च्या वीज उपकेंद्रात दिवस रात्र पाळी साठी वीज कर्मचारी तैनात आहेत परंतु सदर कर्तव्यावर असलेले वीज कर्मचारी या क्रमांक वर प्रतिसाद देत नाही त्यामुळे वीज ग्राहकांना रात्री अपरात्री थेट वीज उपकेंद्र गाठावे लागत आहे अनेकवेळा वीज उपकेंद्राचा दूरध्वनी उचलल्या जात नसल्याच्या तक्रारी वरिष्ठ कडे करण्यात आलेल्या आहे परंतु वरिष्ठ पाताळी वरून अद्यापही कोणत्याही सूचना या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या नसल्याचे दिसून येत आहे

# पान सहा वरून

**उत्कर्ष एनजीओने...**

वाघमारे पुढे म्हणतात, भक्तांचा प्रतिसाद पाहून आम्हाला आनंद झाला. त्यांना कापडी पिशव्या आणि स्टीलच्या पाण्याच्या बाटल्या उपयुक्त वाटल्या आणि त्यांचे महत्त्वही कळले. यापुढे ते यात्रेत प्लास्टिकच्या पिशव्या किंवा बाटल्या वापरणार नाहीत, असेही ते म्हणाले.उत्कर्ष वारीदरम्यान ५ लाखांहून अधिक भाविकांपर्यंत पोहोचेल आणि त्यांना कापडी पिशव्या आणि स्टीलच्या पाण्याच्या बाटल्या यांसारख्या पर्यावरणपूरक वस्तू उपलब्ध होतील, ज्या त्यांना दीर्घकाळ वापरता येतील याची खात्री होईल. ५ लाख भाविक घरी परतल्यानंतरही कधीही प्लास्टिकच्या कॅरीबॅगचा वापर करणार नाहीत याची खात्री करण्याचे उत्कर्षचे उद्दिष्ट आहे. उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन ही मुंबई स्थित एक ना-नफा संस्था आहे, ज्याच्या शाखा तामिळनाडू, पंजाब, उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेशात आहेत. यावर्षी ते समाजसेवेच्या १४व्या वर्षात पदार्पण करत आहेत. उत्कर्ष, पर्यावरणाव्यतिरिक्त, प्राणी कल्याण, महिला शिक्षण आणि सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण, आपत्ती सज्जता, आरोग्य सेवा, रस्ता सुरक्षा आणि बरेच काही क्षेत्रात देखील कार्य करते.

**महाराष्ट्रात 'भारतरत्न...**

त्यांची साहित्य क्षेत्रात उपेक्षा झाली.असे चित्र तयार करण्यात आले. परंतु जगातील २७ भाषांमध्ये ज्यांचे साहित्य लिहिले गेले. त्यांना भारतरत्न का मिळू नये यासाठी ही संघर्ष यात्रा महाराष्ट्रात निघणार आहे. अशी माहिती अजिंक्य चांदणे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली.

**कोरडेवाडीत भाजपा...**

फाट्याजवळ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यावेळी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच विविध ठिकाणी वाजतगाजत पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

**विद्यापीठाचा दिशाभूल...**

राज्य आयोग,राज्यपाल यांच्याकडे मागील दोन वर्षात दाद मागितली.त्यांनी तक्रार निवेदन राज्यपालांकडे दिले म्हणून खोटी चौकशी लावली आहे. चौकशीचे लावण्याचे कारण तक्रारी केल्या असे दाखवण्यात आले आहे.दोन वर्ष पाठपुरावा करूनही न्याय मिळाला नाही.राज्यपालांनी १०जून २०२४रोजी अतिरिक्त सचिव याना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.या बाबींवर कुलसचिव कुलगुरूंच्या मान्यतेने वस्तुस्थिती न सांगता दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करत आहेत.

**जिलेटीनच्या स्फोटात...**

घेऊन परतल्यावर आनंदची आई पार्वती हालकडे यांनी या तिघांविरोधात गुन्हा दाखल करावा म्हणून केज पोलिस ठाण्यात खेट्या मारल्या. परंतु पोलिसांनी आरोपींना पाठीशी घालत या महिलेला परत पाठविले. वारंवार असेच होत असल्याने पार्वती यांनी नंतर पोलिस ठाण्यात जाणेच बंद केले. ३ जुलै रोजी पार्वती या आनंदला घेऊन जिल्हा रुग्णालयात आल्या. दिव्यांग प्रमाणपत्र काढत असतानाच ही माहिती सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांना समजली. त्यांनी सर्व माहिती घेत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आणि हे प्रकरण महिला व बाल कल्याण समितीकडे पाठविले. तेथून मग कारवाईला वेग आला आणि आरोपींविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

**स्वराती रुग्णालयात...**

आहे तरी स्वामी रामानंद तीर्थ हॉस्पीटल येथील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रित करून भोगस डॉक्टर, मोकाट शिखाऊ उमेदवारांना ज्यांना पेशंटला काय झाले आहे ते कळत अशा डॉक्टर,प्रशिक्षणार्थी वर कडक कारवाई करण्यात यावी असे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची व नागरिकांनी भावना व्यक्त केल्या जात आहेत.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# शिवसंग्रामकडून भव्य रोजगार मेळावा

## डॉ.ज्योती मेटे : नामांकित कंपन्यांत ५ हजार नोकऱ्या

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबानी नेहमीच समाज उपयोगी चळवळ राबवली,समाजातील अनेक सर्वसामान्यांना याचा फायदा देखील झाला यामध्ये त्यांनी नोकर भरती मेळावे घेतले यातून अनेक बेरोजगार तरुणांना रोजगार देखील उपलब्ध झाला. लोकनेते विनायकराव मेटे यांच्या वारसा कायम पुढे चालवत शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांनी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन दि.. १५ जुलै सोमवार रोजी आशीर्वाद मंगल कार्यालय,बार्शी रोड, बीड येथे सकाळी ०९ ते सायं.०५ या वेळेत केले आहे. यात ४० नामांकित कंपन्यांत ५ हजार नोकऱ्या उपलब्ध केल्या आहेत. तसेच



या रोजगार मेळाव्यात तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. ज्योती मेटे यांनी केले आहे.

> या मेळाव्यासाठी उमेदवारांनी सकाळी ०९ ते ०५ या वेळेत मेळाव्याच्या ठिकाणी बायोडेटा, मार्कशीट, आधार कार्ड यासह आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावी तसेच ९५६१३३१२०१ या व्हाट्सअप क्रमंकावर नोकरी मोहत्सव असा मेसेज पाठवा असे आव्हान डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केले आहे.

ऊसतोड मजुरांचा जिल्हा अशी ओळख असलेल्या जिल्ह्यात मोठे उद्योग नसल्याने जिल्ह्यातील तरुण बेरोजगार आहेत. अश्यात वाढत चाललेली बेरोजगारी ही मोठी समस्या आहे. तरुणांकडे कौशल्य आहे परंतु त्यांच्या कौशल्याला वाव मिळावा यासाठी जिल्ह्यात एकही मोठा उद्योग नाही. परिणामी जिल्ह्यातील तरुण बेरोजगारीच्या छायेत आहेत. त्यांच्या हाताला काम मिळावे , रोजगार मिळावा ते स्वावलंबी व्हावेत यासाठी शिवसंग्रामच्या पुढाकाराने लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आणि जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून डॉ.ज्योती मेटे यांनी या मेळाव्याचे आयोजन केले आहे. यात ४० नामकित कंपन्यांत १० वी, १२ वी, आय. टी. आय, सर्व पदवीधर, इंजीनियरिंग, नर्सिंग इतयदीसाठी ५ हजार नोकऱ्या उपलब्ध असणार आहेत.

# सिरसाळा येथे मिठाई वाटून जल्लोष

## निवडणूक : पंकजाताई मुंडेंचा विधान परिषदेत विजय



सिरसाळा:पुण्यभूमी प्रतिनिधी

काल महाराष्ट्र राज्याची विधान परिषद निवडणूक पार पडली, यात भाजप – महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचा २६ मतांनी विजय झाला आहे. ताईंच्या ह्या या बद्दल सिरसाळ्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात फटाके फोडून, मिठाई वाटून कार्यकर्त्यांनी विजय उत्सव साजरा केला आहे. बीड लोकसभा निवडणुकीत पंकजाताईंचा पराभव झाल्यानंतर कार्यकर्ते नाराज होते . ताईंना राज्यसभेवर घेण्याची मागणी होत असतांनाच ऐन वेळी झालेल्या विधान परिषद निवडणुकीत त्यांना उमेदवारी महायुती च्या वतिने देण्यात आली , उमेदवारी मिळताच कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या , काल निकाल घोषित झाल्याने पंकजाताईंच्या विजयाने सिरसाळ्यातील कार्यकर्त्यांनी विजयाचा आनंद उत्सव साजरा केला आहे. या वेळी सरपंच अन्वर पट्टेदार, मुन्ना काळे सर,कपिल भाऊ चोपडे,तौफिक भाई सिद्दीकी ,आशफाक भाई पठाण , तौफिक कुरेशी , बाळासाहेब पांडे संतोष धानोरकर, तुकाराम आचार्य, किरण डोंगरे, घोळवे अप्पा , कैलास कावरे , विशाल राठोड आदीसह अनेकजण उपस्थित होते .

# बीडमध्ये शिवसंग्रामचा रोजगार मेळावा

## मनोज जाधव :५ हजार तरुणांना नोकऱ्या, लाभ घ्यावा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे यांच्या सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून आणि शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने होत असलेल्या भव्य रोजगार मेळाव्यात एकाच छताखाली राज्यातील ४० नामांकित कंपन्यांत ५ हजार नोकऱ्या उपलब्ध केल्या जाणार आहेत. हा मेळावा बीड येथील आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड येथे दि.१५ जुलै सोमवार रोजी सकाळी ०९ ते ०५ या वेळेत होणार आहे. तरी युवकांनी या मेळाव्यात सहभागी होत या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केले आहे. बेरोजगार तरुणाच्या हाताला काम मिळावे आणि ते रोजगाराच्या दिशेने वळावेत या उदात्त हेतूने स्वर्गीय लोकनेते विनायकराव मेटे यांनी नेहमीच प्रयत्न केले होते. याच धर्तीवर स्वर्गीय विनायकराव मेटे यांचा वारसा पुढे चालवत डॉ. ज्योती मेटे यांच्या संकलापनेतून या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्याचा फायदा जिल्ह्यातील अनेक तरुणांना होणार असून यातून त्यांना चांगल्या कंपन्यांत रोजगार मिळणार आहे. याचा लाभ घेण्यासाठी तरुणांनी या मेळाव्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# सरकारचे धनगर आरक्षणाकडे दुर्लक्ष!

## मिनाक्षी डोमाळे : उपोषणामुळे प्रश्न पुन्हा ऐरणीवर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यातील शिंदे सरकार धनगर समाजाच्या आरक्षणाकडे दुर्लक्ष करत असून फक्त मतांसाठी निर्णायक ठरत असलेला धनगर समाजाचा वापर सरकार करतेय का? राज्यात बीडमधील बार्शी नाका येथे आज १३ व्या दिवशी धनगर समाज बांधव उपोषण करत आहेत तसेच लातूर येथे आज १४ व्या दिवशी धनगर समाज उपोषण करत असून सरकार केवळ मतदानापुरताच धनगर समाजाचा वापर करुन घेत समाज बांधवांची फसवणुक करत आहे का? असा सवाल पत्रकाद्वारे धनगर



समाज अहिल्या महिला आघाडीच्या प्रदेशसचिव मिनाक्षी डोमाळे-देवकते यांनी केला आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राज्यात ५० पेक्षा जास्त मतदारसंघात धनगर समाजाची मते जास्त निर्णायक आहेत असे असतांना देखील लोकसभा निवडणुकीत एकही उमेदवार केंद्र सरकारने दिला नाही तसेच महाराष्ट्रात देखील कुठल्याही पक्षाच्या उमेदवारासाठी धनगर समाजाची मते निर्णायक ठरत असतात त्यामुळे निवडणुका लागल्या की धनगर समाजाची प्रश्न सोडवू, धनगर समाजाचा एसटीमध्ये समावेश करु असे खोटे आश्वासन देत धनगर समाजाची फसवणूक करुन मतदान घेणार्या सरकारला येत्या विधानसभा निवडणुकीत धनगर समाज धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असेही पत्रकाद्वारे त्यांनी म्हटले आहे.

# चौसाळा शहरातील पथदिवे बंद अवस्थेत

बीड: तालुक्यातील चौसाळा ग्रामपंचायत ही सध्या चर्चे चा विषय ठरत असुन येथिल नागरिकांना मुलभुत सुविधा देण्यास ग्रामपंचायत स्पसेल फेल झालेली पाहीला मिळत आहे . शहरात तुंबलेल्या नाल्या , सफाई कामगारांची कमतरता तसेच शहरात विविध वार्डात बसविण्यात आलेले पथदिवे हे बंद अवस्थेत असुन वेळोवेळी याची कल्पना ग्रामपंचायतला देवुन सुध्दा कुठलीच कारवाई होताना दिसत नाही तसेच चौसाळा शहराला पाणी पुरवठा करणारया पाण्याच्या टाकीखाली गवताचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढले असुन मच्छराचे प्रमाण ही वाढल्याचे पाहायला मिळत आहे यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असुन याकडे लक्ष देण्यास चौसाळा ग्रामपंचायतला वेळ नाही का ? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारताना दिसुन येत आहे शहरात लाखो रूपये खर्च करून बसविलेले पथदिवे बंद असल्यामुळे परिसरात अंधार दिसुन येत आहे .

# वारकऱ्यांची सेवा साधणारे प्रतिष्ठाण

## अध्यात्मिक : पाच हजार वारकऱ्यांची होतेय सोय



पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आषाढी एकादशीला पंढरपूरला जाण्यासाठी अनेक विठुभक्तांना पंढरपूरची ओढ लागलेली असते.अनेक वारकरी हे डोंगरकिन्ही येथिल श्री संत वामणभाऊ मंदिर प्रतिष्ठाण येथुनच जात असतात.यावर्षी पंढरपूर कडे जाणाऱ्या एकुण पस्तीस दिंड्या व पाच हजारांच्या वर वारकऱ्यांची सेवा साधणारे डोंगरकिन्ही येथिल वामणभाऊ मंदिर प्रतिष्ठाण असुन त्यांच्या या सेवेची वारकऱ्यांनी वाखाणाणी केली आहे.

डोंगरकिन्ही येथिल श्री संत वामणभाऊ मंदिर हे पंचवीस वर्षांपासून अस्तित्वात आले आहे.चेअरमन हनुमंत येवले व वसुदेव येवले यांनी या मंदिरासाठी स्वतः ची जमीन दिली आहे तर बौध्द समाजातील सोनवणे परिवाराने यज्ञ सभागृहासाठी व सप्ताहासाठी जागा दिली आहे.भाविकांच्या लोकवर्गणीतून हे मंदिर नावा रुपाला आले असुन एक तिर्थक्षेत्र निर्माण झाले आहे.हे मंदीर पैठण पंढरपूर या पालखी मार्गावर असल्याने याच मार्गाने जाणाऱ्या सर्व दिंड्या येथे येत असतात.मंदिर व्यवस्थापन या वारकऱ्यांना नाष्टा, जेवण देऊन त्यांची सेवा करतात.पंढरपुर कडे जाणाऱ्या ३५दिंड्या व पाच हजार वारकऱ्यांची सेवा साधली आहे. वारकऱ्यांसाठी सर्व विश्वस्त व भाविक,डोंगरकिन्ही येथिल तरुण यांनी अनमोल वेळ देऊन सेवा दिली आहे. डोंगरकिन्ही येथिल वामणभाऊ मंदिर प्रतिष्ठाण ने केलेल्या सेवेबद्दल दिंडी चालकांनी व वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक,समाज प्रबोधन व साहित्यीक क्षेत्रात कार्य करणा-या कलावंत, साहित्यीक, समाज प्रबोधनकार आणि समाज सेवकांना तसेच समाजासाठी कार्य करणा-या संस्थाना प्रतिवर्षी वैशाख शुध्द (अक्षय तृतीया) या दिवशी एक व्यक्ती व एक संस्था यांना महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार देण्यात येणार आहे.यासाठी प्रस्ताव सादर करावेत असे आवहान इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे.प्रस्ताव सादर करतांना विरशैव- लिंगायत समाजासाठी करण्यात आलेले कार्य या संदर्भातील माहिती व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. त्याबाबतचे प्रस्ताव विहित नमून्यात दि. २६ जुलै २०२४ पर्यंत सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ४ था मजला येथे विहित नमून्यात सादर करावेत.

# मामाकडून अल्पवयीन भाचीचे अपहरण

## बोंबला : सोयगाव तालुक्यातील घटना

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

आईच्या मावशीच्या घरी आलेल्या भाचीला मामाने कपडे घेऊन देण्याची फुस लावून अपहरण केल्या ची घटना सोयगाव तालुक्यातील हनुमंत खेडा येथे (दि ५) ,जुलै ला उघडकीस आली होती याप्रकरणी गुरुवारी (दि ११) सोयगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून रात्री दहा वाजता अपहरण चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

पाचोरा तालुक्यातील आंबे वडगाव येथील विनोद नामदेव शेरावते असे आरोपीचे नाव असून तो पीडितेचा नात्याने मामा आहे पिडीत अल्पवयीन मुलगी ही सात ते आठ दिवसापासून तिच्या आईच्या मावशीच्या घरी हनुमंत खेडा ता सोयगाव येथे आलेली होती दरम्यान पाचोरा तालुक्यातील आंबे वडगाव येथील विनोद शेरावते यांनी (दि ०५) हनुमंत खेडा गाठून अल्पवयीन भाची हिस कपडे घेऊन देतो म्हणून तिचे अपहरण केल्याची फिर्याद पीडित मुलीच्या आईने सोयगाव पोलीस ठाण्यात शुक्रवारी दि ११ दिली यावरून सोयगाव पोलीस ठाण्यात अपहरण चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रजाक शेख उपनिरीक्षक सतीश बडे राजू बर्डे विकास दुबिले संदीप सुसर दिलीप पवार आदी करत आहे

# विजयामुळे कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळेल

## राजेंद्र मस्के: पंकजाताईंचा विधानपरिषदेत विजय

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचा महाराष्ट्र विधानपरिषदेत झालेल्या विजयामुळे बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व सर्वसामान्य जनतेमध्ये समाधान व आनंद व्यक्त केला जात आहे. गेली पाच वर्षापासून जबाबदारीचे पद नसल्यामुळे जिल्हाच्या विकासाला न्याय देता आला नाही.

पंकजाताईं विधान परिषदेच्या आमदार झाल्यामुळे विकास कामाला पुन्हा एकदा गती मिळणार आहे. आजच्या विजयामुळे भाजपा कार्यकर्त्याला निश्चितपणे ऊर्जा मिळेल अशी प्रतिक्रिया भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली



असून, पंकजाताईंच्या विजयाचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत विजय झाला.

आज या विजयाचा आनंदोत्सव संघर्षयोद्धा भाजपा कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

## डाकघर : लाडकी बहीण योजनेसाठी नियोजन

# पोस्टात खाते उघडण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागातर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण व लेक लाडकी या योजना सुरु करण्यात आल्या असून या योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते उघडावे, असे आवाहन अधीक्षक डाकघर बीड विभाग बीड यांनी केले आहे.या दोन्ही योजनांचा लाभ घेण्याची कार्यपद्धती शासनाच्या महिला व बाल विकास विभागमार्फत राबविण्यात

येत असून आर्थिक लाभ डीबीटी पद्धतीने देण्यात येणार आहे. यासाठी बचत खाते उघडणे आवश्यक असून ते जवळच्या कोणत्याही पोस्त ऑफिस मध्ये उघडता येईल.मुख्यमंत्री माझी





लाडकी बहिण या योजने अंतर्गत तिच्या स्वतः च्या बचत खात्यात थेट रु. १ हजार ५०० इतकी रक्कम जमा करण्यात येणार आहे. यासाठी पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाते उघडण्यासाठी आधार कार्ड,पॅन कार्ड व ३ फोटो ई. कागदपत्रे आवश्यक आहेत.तसेच लेक लाडकी या योजने अंतर्गत लाभार्थ्यांना विविध टप्प्यावर देण्यात येणारा लाभ थेट बचत खात्यावर जमा करण्यात येईल.

### असे लागणार कागदपत्रे

यासाठी पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते उघडण्यासाठी मुलीचे जन्म प्रमाणपत्र ,मुलीचे आधार कार्ड, आईचे आधार कार्ड, पॅन कार्ड व ३ फोटो ई. कागदपत्रे आवश्यक आहेत.बीड जिल्ह्यातील पात्र महिला लाभार्त्यांनी आपल्या जवळच्या पोस्टऑफिस मध्ये ड्ड चे खाते अथवा इंडियापोस्ट पेमेंट बँकेचे खाते उघडून घ्यावे. भारतीय डाक विभाग बीड अंतर्गत जिल्ह्यातील एकूण ३४२ पोस्ट ऑफिस तत्पर सेवेत अग्रेसर आहे. तसेच या योजनेअंतर्गत पोस्ट ऑफिसमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी खाते उघडावेत.

# नीरज लाहोटीचे सीए परीक्षेत यश

## कौतूकास्पद : सर्व स्तरातून होतेय अभिनंदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड येथील ओम प्रिंटर्सचे मालक ओमप्रकाश सिकची यांचे भाचे गंगापुर येथील रहिवासी नीरज संजयकुमार लाहोटी हा सीए परीक्षेत उत्तीर्ण झाला. निरजने मोठ्या प्रमाणावर मेहनत घेवून ही सी.ए. परीक्षा चांगल्या गुणाने उत्तीर्ण केली आहे. निरज हा पहिलीपासूनच हुशार आणि मेहनती आहे. त्याच्या मेहनतीला चांगले उज्वल यश प्राप्त झाले आहे.



यावेळी गंगापूर येथील माहेश्वरी समाजातून, व्यापारी बंधुतून तसेच सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन केले असून बीड येथील जगदीश सिकची, बालाप्रसाद सिकची, ओमप्रकाश सिकची, अशोक सिकची, सौरभ सिकची, शुभम् सिकची, दर्शन सिकची यांच्यासह बालमुकूंद लड्डा, जुगलकिशोर लड्डा, ब्रिजमोहन लड्डा, अशोककुमार लड्डा, संजय लड्डा, धिरज लड्डा, पवन लड्डा, कृष्णा लड्डा यांनी निरजचे अभिनंदन केले आहे.

**सुविचार** -समस्या ही एक संधी असते त्याहून उत्तम, सर्वोत्तम करून दाखविण्यासाठी.

# राजा उदार तर झाला....?

लोकसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वी अर्थसंकल्पाचा पहिला भाग सादर करणाऱ्या महायुती सरकारने लोकसभा निवडणुकीनंतर पूर्ण अर्थसंकल्प सादर केला. अर्थातच लोकसभा निवडणुकीचा प्रभाव या अर्थसंकल्पावर पडणे स्वाभाविक होते. लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित कामगिरी करता आली असती तर कदाचित सध्या जो दौलतजादा सरकारकडून पाहायला मिळत आहे तो दिसला नसता, हे स्पष्टच आहे. लोकसभा निवडणुकीत झालेली मानहानी भरून काढण्यासाठी किंवा

लोकसभेत झाले ते विधानसभेत होऊ नये म्हणून अर्थमंत्र्यांनी राज्याच्या तिजोरीचे दरवाजे अगदी सताड उघडले. या अर्थसंकल्पातील सर्वाधिक चर्चित योजना अर्थातच 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' ही आहे. या योजनेच्या निकषात न बसणाऱ्या दहा टक्के महिला मतदार वगळल्या तर राज्यातील जवळपास चाळीस टक्के मतदारांना या योजनेच्या माध्यमातून आकर्षित करण्याचा प्रयत्न महायुती सरकारने केल्याचे दिसते; परंतु ही योजना जाहीर करताना आणि असाच इतर दौलतजादा करताना सरकारने राज्याच्या तिजोरीची स्थिती काय आहे याचा विचार केल्याचे दिसत नाही. सध्या महाराष्ट्रावर साधारण सात लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. शिवाय सरकारच्याच

आकडेवारीनुसार वित्तीय तूट साधारण एक लाख कोटीच्या घरात आहे आणि महसुली तूट वीस हजार कोटी आहे. थोडक्यात सांगायचे तर राज्य दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे. उत्पन्न कमी आणि तुलनेत खर्च अधिक आणि तो वाढताच, अशी परिस्थिती असताना अजितदादा पवार, देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे अर्थतज्ज्ञ ज्या सरकारमध्ये आहेत, त्या सरकारने केवळ निवडणुकीचा विचार करून असे अर्थदुष्ट निर्णय घ्यावेत ही अतिशय खेदाची बाब म्हणावी लागेल. या लोकाकर्षक योजनांचा भार महाराष्ट्राची तिजोरी फार काळ पेलवू शकणार नाही. ही सगळी आश्वासने पूर्ण करण्यासाठी पुन्हा कर्ज काढण्याखेरीज कोणताही उपाय दिसत नाही. आधीच कर्जाचा डोंगर इतका प्रचंड आहे की त्याचे व्याज फेडणेदेखील जड जात आहे, त्यामुळे पुढच्या सरकारला या सगळ्या आर्थिक आव्हानांना कसे तोंड द्यायचे हा प्रश्न नक्कीच पडेल. पुन्हा महायुतीचे सरकार आले तरी सध्या घोषित केलेल्या सगळ्या योजना जशाच्या तशा सुरू ठेवणे या सरकारलाही शक्य होणार नाही. हा अर्थगोंधळ एवढ्यातच संपलेला नाही. विधानसभेत विनियोजन विधेयक मंजूर झाल्यानंतर लगेच या सरकारकडून जवळपास ९५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या. काही आकस्मिक कारणांमुळे अर्थसंकल्पाखेरीज विशेष तरतूद करावी लागत असेल तर त्यासाठी पुरवणी मागण्या मांडल्या जातात; परंतु अर्थसंकल्प सादर होऊन काही तास उलटत नाही तोच पुरवण्या मागण्या पुढे करण्यात आल्या, याचा अर्थ अर्थसंकल्पातून जी तजविज करणे शक्य झाले नाही; परंतु राजकीयदृष्ट्या ती करणे अतिशय गरजेचे होते ते पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून साधल्या गेले. बरेचदा एखादी योजना घोषित होते तेव्हा त्यासाठी अपेक्षित खर्च प्रत्यक्ष काम सुरू झाल्यावर वाढतो, त्यावेळी तो अधिकचा खर्च पुरवणी मागण्यातून मान्य केला जातो; परंतु अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर लगेच पुरवणी मागण्या मांडल्या जात नाही, कोणत्या योजनेला किती पैसा कमी पडतो याचा हिशेब करण्यासाठी काही तर वेळ लागणारच ना; परंतु सगळेच संकेत गुंडाळून ठेवायचे म्हटल्यावर अशा तर्कांना काही अर्थ राहत नाही. पुरवणी मागण्यांचा आकार किती असावा याचेही काही संकेत आहेत. साधारण अर्थसंकल्पाच्या तुलनेत कमाल दहा टक्के, म्हणजे अगदी खूप मोठे अरिष्ट राज्यावर कोसळले तर इतकी मागणी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून केली जाते; परंतु असे कोणतेही संकट सध्या समोर नसताना आणि भविष्यात येण्याची सध्या तरी कोणतीही शक्यता दिसत नसताना तब्बल ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. ही टक्केवारी अर्थसंकल्पाच्या तुलनेत १५ टक्क्यांवर जाते. मुळात अर्थसंकल्पात घोषित करण्यात आलेल्या योजनांसाठीच सरकारच्या तिजोरीत पैसा नसताना वर या जवळपास एक लाख कोटीच्या पुरवणी मागण्या मान्य केल्या जात असतील तर हे सरकार जनतेच्या डोळ्यात केवळ धूळ फेकण्याचे काम करीत आहे असेच म्हणावे लागेल. अर्थात कागदोपत्री निधी घोषित करणे आणि प्रत्यक्षात तो उपलब्ध होणे यात खूप अंतर आहे, राज्याची तिजोरी पाहता हा राजा केवळ कागदोपत्रीच उदार झाला आहे असे दिसते. जनतेच्या हे लक्षात येईल तोपर्यंत कदाचित विधानसभा निवडणुकीचा सोहळा पार पडला असेल, त्यासाठीच तर हा सगळा ओढूनताणून केलेला अट्टाहास आहे.

# महायुतीची बाजी....!

संख्याबळाचे समीकरण अवघड असतानाही विधानपरिषद निवडणुकीत महायुतीने आपले सगळे उमेदवार निवडून आणीत महाविकास आघाडीला धक्का दिला आहे. लोकसभा निवडणुकीतील महायुतीच्या मानहानीकारक पराभवावर हा विजय नक्कीच फुंकर घालणारा ठरला आहे. खरे तर तीन उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविणाऱ्या महाविकास आघाडीकडे स्वतःचे ६७ इतके संख्याबळ होते आणि केवळ दोनच आमदारांना आपल्या बाजूने त्यांना वळवायचे होते. तुलनेत हे काम अधिक सोपे होते. शिवाय बहुजन विकास आघाडी, सपा, एमआयएम या सारखे पक्ष महायुतीला मतदान करण्याची शक्यता खूपच कमी होती, त्यामुळे पडणारा उमेदवार महायुतीचाच असेल आणि त्यातही अजित पवारांच्या एका उमेदवाराला पराभवाचा धक्का बसेल असेच बोलले जात होते. अजित पवार गटातील काही आमदारांनी शरद पवार गटाशी संपर्क साधल्याच्या चर्चादेखील समोर येत होत्या. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही अजित पवारांकडच्या काही आमदारांनी आपली भेट घेतल्याचे म्हटले होते. पुढच्या विधानसभा निवडणुकीतील गणित लक्षात घेऊन आपल्याला सुरक्षित करण्यासाठी दादांकडचे काही आमदार स्वगृही परतण्याची शक्यता आधीपासूनच वर्तविली जात होती, त्याचे प्रत्यंतर विधानपरिषद निवडणुकीत येईल अशी चर्चा होती. शरद पवारांचा विश्वास जिंकण्यासाठी ही एक चांगली संधी या कथित बंडखोर आमदारांकडे असल्याचा तर्कदेखील समोर केला जात होता; परंतु तसे काहीच झाले नाही. उलट अजित पवार गटाची संख्या पाहता त्यांना या निवडणुकीत बाहेरच्या पाच आमदारांनी मदत केल्याचे दिसून आले. याचा अर्थ मागच्या प्रमाणेच याहीवेळी फडणवीस आणि कंपनीने अगदी योग्य नियोजन करीत विरोधकांना धक्का दिला असे दिसते. महायुतीच्या या विजयाने महायुतीतील तिन्ही पक्षांचे मनोबल नक्कीच वाढले आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत अधिक सकारात्मक ऊर्जेने महायुती लढेल. अर्थात विधानसभेत जनतेचे मतदान असते आणि जनतेचा विश्वास पुन्हा प्राप्त करण्यासाठी महायुतीला खूप अधिक परिश्रम करावे लागणार आहेत, हेही तितकेच खरे.

## भाष्य



प्रभाकर कोंडबत्तुनवार
+917620760011

# मोदी सरकारची दहा वर्षे...



या देशातील जनतेला उशिरा का होईना, जाग आली. धर्माच्या आडोशाने धर्मसत्ताक राज्यव्यवस्था निर्मितीसाठी सुरू झालेले प्रयत्न तिला उमजले. अशा राज्य व्यवस्था निर्मितीतील मुख्य अडथळा असलेली राज्यघटना बदलण्यासाठी, नव्हे, ती गुंडाळण्यासाठी मोदींनी 'अब की बार, चार सौ पार' ही घोषणा दिली. या देशातील जनतेने स्वच्छ प्रशासनासाठी मोदींना लागोपाठ दोनदा भरभरून संधी दिली; परंतु, चार सौ पार चा धोका लक्षात येताच, संधी साधत भारतीय जनतेने मोदी आणि त्यांच्या भक्त-पिलावळीचा मनसुबा हाणून पाडला.

केंद्रात एनडीएचे सरकार स्थापन होऊन एक महिना झाला आहे. एवढ्या कमी काळात कोणत्याही नव्या सरकारच्या कामगिरीचे मूल्यमापन करता येणार नाही. तथापि, सरकारचे नाव बदलले आणि दहा वर्षांपासून तेच राज्यकर्ते असल्याने त्यांच्या कारभाराचा लेखाजोखा घेतला पाहिजे. या सरकारच्या देशांतर्गत, आर्थिक, संरक्षण आणि परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन झालेच पाहिजे.

गेल्या दहा वर्षांत मोदीचे सरकार होते. त्या काळातील देशांतर्गत धोरणावर भरभरून टीका करता येईल.

काँग्रेसने सत्तर वर्षांत काय केले? असा प्रश्न नरेंद्र मोदी यांनी २०१४ च्या निवडणुकीत उपस्थित केला आणि त्याचे भांडवल केले. ईडी आणि तत्सम केंद्रीय चौकशी यंत्रणा विशिष्ट हेतूने कामाला लावल्या. सामान्य जनतेला बरे वाटले... भ्रष्टाचारविरोधी मोहीम सुरू झाल्याने साधारण माणूस सुखावला... भारावून टाकणारी पावले टाकत जनतेला मुग्ध केले. ती मंदगतीने सापळ्यात अडकणे सुरू असतानाच, धर्म-मंदिर-मशीद असे जाळे मोदी आणि त्यांच्या झुंडीने फेकले. कोणी काय खावे आणि काय खाऊ नये, याविषयी आक्रमकपणे घोषित-अघोषित मोहीम राबविण्यात आली. अल्पसंख्याक भयभीत असतील, दडपणाखाली असतील, अशी वातावरणनिर्मिती करण्यात आली. जे अल्पसंख्याक झुकले, त्यांना सोन्याचे पिंजरे लाभले. जे झुकले नाहीत ते देशद्रोही असल्याचे सांगितले जाऊ लागले.

जगातील लोकशाही राज्यव्यवस्था असलेल्या देशात मीडिया एकांगी नाही. म्हणूनच, अमेरिका असो वा ग्रेट ब्रिटन, तेथील लोकशाही बलशाली आहे. भारतात काय घडले? विरोधी स्वर दडपून टाकण्यासाठी गेल्या दहा वर्षांत सरकारने मीडियावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नियंत्रण मिळवले. जर्मनीत तर हिटलर असाच वागला होता. जनतेला कोणती माहिती द्यावी आणि देऊ नये, अशी काळजी गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने घेतली. मीडिया विशिष्ट विचारसरणीच्या नियंत्रणाखाली आले. जुमानत नव्हते त्यांच्या कार्यालयांवर सरकारी धाडी घालण्यात आल्या. टीव्ही चॅनल्स विकत घेण्यात आल्या. जनतेला एकतर्फी, तीदेखील केवळ सरकारी हिताची माहिती मिळत राहील याची संपूर्ण काळजी मोदी सरकारने घेतली.

अशा स्थितीतही या देशातील तुरळक दैनिक स्वातंत्र्य टिकवू शकले, हेदेखील महत्त्वाचे आहे.

चोवीस तास एकतर्फी माहितीचा मारा आणि धर्मांधतेला प्रोत्साहन दिले गेले. त्याचा परिणाम म्हणून जनतेसाठी अन्य प्रश्न गौण ठरले. 'मोदी है तो मुमकीन है,'चे नारे लागले. धर्मांधता वाढीस लागली. धर्मनिरपेक्षता कुरतडली जाऊ लागली. सश्रद्ध जनतेला धर्मोन्मादी प्रवाहात सोडण्यात आले.

मूळ समस्या आणि प्रश्नापासून जनतेचे लक्ष अन्यत्र वेधण्यासाठी धार्मिक आधार घेण्यात आला. सत्तेवर पकड कायम ठेवण्यासाठी धनाची गरज असते. ती भागवण्यासाठी कार्पोरेट घराण्यांना बळ देण्यात आले. अदानी-अंबानी वाढले ते यामुळेच! विरोधी पक्षांची राज्यातील सरकारे येनकेन प्रकारे पाडण्यात आली. यासाठी साम-दाम-दंड-भेद, असे सर्व मार्ग अवलंबण्यात आले. स्वपक्ष या देशातील सर्वात मोठा पक्ष व्हावा यासाठी इतर पक्षांचा बळी घेण्यात आला.

मणिपूर वांशिक हिंसाचारात होरपळून निघाले... रोम जळत असताना नीरो फिडेल वाजवत राहिला.

या देशातील जनतेला उशिरा का होईना, जाग आली. धर्माच्या आडोशाने धर्मसत्ताक राज्यव्यवस्था निर्मितीसाठी सुरू झालेले प्रयत्न तिला उमजले. अशा राज्य व्यवस्था निर्मितीतील मुख्य अडथळा असलेली राज्यघटना बदलण्यासाठी, नव्हे, ती गुंडाळण्यासाठी मोदींनी 'अब की बार, चार सौ पार' ही घोषणा दिली. या देशातील जनतेने स्वच्छ प्रशासनासाठी मोदींना लागोपाठ दोनदा भरभरून संधी दिली; परंतु, चार सौ पार चा धोका लक्षात येताच, संधी साधत भारतीय जनतेने मोदी आणि त्यांच्या भक्त-पिलावळीचा मनसुबा हाणून पाडला.

## मंथन



प्रा. डॉ. विनोद गायकवाड
9850324202
vkgaikwad08@gmail.com

# भारत-रशिया मैत्रीत अमेरिका व चीनची भूमिका!

पंतप्रधान नरेंद्र मोदींना रशियाने 'ऑर्डर ऑफ सेंट अँड्र्यू द अपॉस्टल' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले. बदलत्या आंतरराष्ट्रीय समीकरणांमध्ये हा सन्मान तसेच रशिया-युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे पंतप्रधान मोदींचा हा दौरा महत्त्वपूर्ण ठरला. अमेरिका, रशिया व चीन या महासत्ता देशांमधील शीतयुद्धामुळे भारताच्या भूमिकेकडे जगाचे लक्ष असते. म्हणूनच मोदींच्या या रशिया दौऱ्याचा महासत्ता देशांनी आपापल्या भूमिकेतून अर्थ लावला.

१९९१ मध्ये सोव्हिएट संघराज्याचे पतन होऊन आठ घटकराज्ये या विशाल संघराज्यातून बाहेर पडले. रशियाच्या विघटनानंतर रशियापासून वेगळा झालेला प्रदेश मिळविण्याचे सतत प्रयत्न रशियाने सुरू ठेवले. २०१५ साली रशिया-युक्रेनमध्ये शांतता करार झाला होता, मात्र अंतर्गत वाद सुरूच होते. त्याचे रूपांतर फेब्रुवारी २०२२ मध्ये मोठ्या युद्धात झाले ते आजही सुरू आहे. युक्रेनने अमेरिका पुरस्कृत नाटो गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याने रशियाने युद्धाचा मार्ग स्वीकारला. या युद्धात अमेरिकेसह युरोपियन देशांनी युक्रेनला लष्करी मदत केली. अमेरिका आणि त्यांचा गट रशिया विरोधात उभा ठाकल्याने दोन्ही देशांतील युद्ध तर लांबले शिवाय अलीकडच्या काळात रशिया-चीन संबंध सुधारले. या दोन्ही देशांमध्ये व्यापार वाढला. आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलत्या घडामोडींमुळे रशिया व चीन हे दोन्ही देश जवळ आले.

दुसरीकडे चीन विरोधात भारत व अमेरिकेमध्ये मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. त्याचे श्रेय निश्चितच पंतप्रधान मोदींना जाते. या मैत्रीपूर्ण संबंधांमुळे भारताने अमेरिकेच्या गटात राहावे आणि या युद्धात रशिया विरोधात भूमिका घ्यावी, असे अमेरिका मित्र देशांना वाटते. म्हणूनच 'भारत-रशिया संबंधांमुळे आम्ही चिंतित आहोत हे अमेरिकेने स्पष्ट केले', असे अमेरिकन परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी म्हटल्याने दोन्ही देशांतील जवळीक अमेरिकेला खटकली हे उघड आहे. अमेरिका सतत भारतावर रशियापासून अंतर ठेवण्यासाठी दबाव टाकतो. मात्र, त्याकडे भारताने प्रत्येकदा दुर्लक्ष केले, कारण स्वातंत्र्यापासूनच भारताचे रशियासोबत जुने मैत्रीपूर्ण संबंध आहेत. भारत-पाक संघर्षात आंतरराष्ट्रीय पातळीवर रशियाने केलेली मदत भारत विसरू शकत नाही. भारत-पाकिस्तान दरम्यान सुरू असलेल्या तणावाच्या काळात विशेषतः जम्मू-काश्मीरच्या प्रश्नावर आंतरराष्ट्रीय पातळीवर रशिया उघडपणे भारताच्या बाजूने उभा राहिला, तर अमेरिका पाकिस्तानच्या बाजूने होता. काश्मीर प्रश्नावर अमेरिकेचे धोरण दुटप्पी राहिले. एकेकाळी पाक पुरस्कृत दहशतवादाला अमेरिकेने खतपाणी घातले. त्यामुळे भारत-रशिया मैत्रीत जेवढी विश्वासार्हता आहे तेवढी भारत-अमेरिका संबंधांमध्ये नाही. अमेरिकेने पाकिस्तानला आर्थिक आणि लष्करी मदत करणे कमी केल्यानंतर जी पोकळी निर्माण झाली ती चीनने भरून काढताना भारताविरोधात पाकला सहकार्य केले. इतकेच नव्हे तर भारतीय भूप्रदेशावर चीन वारंवार दावा करीत असतो. दुसरीकडे भारतापासून रशियाला दूर करण्याचे प्रयत्नही सुरू केले.

भारताने रशिया विरोधात भूमिका घेतल्यास चीन विरोधात पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन अमेरिकेने भारताला दिले. भारताचे अमेरिकेसोबत संबंध सुधारल्याने रशियाने भारतावर विश्वास ठेवू नये, असे चीनला वाटते. या युद्धात युक्रेनच्या बाजूने अमेरिका उतरल्याने युद्ध सुरू राहावे असे चीनला वाटते, तर पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांच्या शिखर बैठकीत, युद्ध असो, संघर्ष असो, दहशतवादी हल्ले असो, मानवतेवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची जीवितहानी होते तेव्हा वाईट वाटते. शांततेचा मार्ग युद्ध क्षेत्रातून जात नाही. शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार असल्याने युद्ध थांबविण्याची विनंती केली. युक्रेन संकटावर पंतप्रधान मोदींनी जो उपाय शोधण्याचा प्रयत्न केला त्याकरिता पुतीन यांनी मोदींचे आभार मानले. एकूणच पंतप्रधान मोदींनी शांतिदूत बनून हा दौरा केला. त्याची दखल जगभरातील माध्यमांनी दोन्ही बाजूंनी घेतली. रशियाचे अध्यक्ष पुतीन आणि भारताचे पंतप्रधान मोदी यांच्या गळा भेटीच्या छायाचित्रावर चिनी माध्यमांनी प्रश्न उपस्थित करताना तुमची देहबोली अनेकदा शब्दांपेक्षा अधिक प्रकट होते, असे विश्लेषण साउथ चाइना मॉर्निंग पोस्टने केले. तर ग्लोबल टाइम्सने रशियाला एकटे पाडण्याचे अमेरिकेचे प्रयत्न अयशस्वी झाल्याची हेडलाईन दिली. युक्रेननेसुद्धा मोदींच्या रशिया दौऱ्याचा विरोध केला. महत्त्वाचे म्हणजे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी आखलेले परराष्ट्र धोरण तटस्थतेचे असल्याने भारत दोन्ही गटांत सामील झाला नव्हता आणि आजही त्याच धोरणांची अंमलबजावणी होत असल्याने दोन्ही देशांच्या गटबाजीत सामील होण्याची भारताविषयी अपेक्षा करणे गैर वाटते. म्हणूनच चीनने कितीही आदळआपट केली तरीही रशिया भारतासोबत मैत्रीपूर्ण संबंधच ठेवेल.

रशियातील भारतीय समुदायाला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट असल्याचे म्हटले. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी रशिया आणि अमेरिका या दोन्ही महासत्तांसोबत व्यापारिक संबंध कायम ठेवणे गरजेचे आहे. भारत लोकसंख्येत क्रमांक एक वर असल्याने ती सर्वात मोठी बाजारपेठ बनल्याने व्यावसायिक संबंध प्रस्थापित झाले. चीनच्या उत्पादित मालाने भारतीय बाजारपेठ व्यापली असली, तरी चीन मात्र भारताला स्पर्धकच समजतो. म्हणूनच आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताविरोधात मोर्चेबांधणी करीत असतो. त्याचाच एक भाग म्हणून चीनने रशियासोबत मैत्री वाढविली. मात्र, रशिया- भारत मैत्री कायम राहावी असे रशियाला वाटते. म्हणूनच भारताच्या पंतप्रधानाला रशियन सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले.

## चळवळ



प्रा.डॉ. इसादास भडके
9096364886
erbfes@gmail,com

# आंबेडकरी चळवळीला नवे सामर्थ्य देणारे लोककवी राजानंद गडपायले

लोककवी राजानंद गडपायले यांचा जन्म १० नोव्हेंबर १९२४ रोजी यवतमाळ येथील पाटीपुरा येथे झाला. त्यांचे खरे नाव लंकानाथ गोविंद गडपायले असे होते. शालेय शिक्षणानंतर कृषी खात्यात नोकरी करून ते पुण्यात स्थायी झाले. बाबासाहेबांच्या चळवळीचा प्रचंड प्रभाव त्यांच्यावर होता. बुद्ध-आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार त्यांनी केला. हिंदुत्ववादी रूढी आणि परंपरा यावर जबरदस्त आघात करून समाजाला नवीन दृष्टी देण्याचा प्रयत्न केला. मित्रमंडळी समवेत त्यांनी 'राजानंद गायन पार्टी'ची स्थापना करून चळवळीला गतिमान केले. राजानंद यांची गाणी ऐकण्याचा प्रसंग बाबासाहेबांना मिळाला. बाबासाहेबांनी त्यांच्या काव्यगायनाची प्रशंसा करून १५ जून १९५० ला स्वतःच्या हस्ताक्षरात त्यांना प्रशस्तीपत्र दिले. हा राजानंदांचा आणि त्यांच्या कलागुणांचा गौरवच म्हणायला हवा.

लोककवी राजानंद यांनी स्वतःला चळवळीत झोकून दिले आणि आंबेडकरी चळवळीला सर्वस्व मानू लागले. जातीयवादी अपप्रवृत्तींना आव्हान देत सनातनी वृत्तीवर आघात केला. जीवनाला नवा अर्थ दिला. "चिंता नाही कसलीच आता, भीमराव या दलितांचा राजा", असा आत्मविश्वास निर्माण करून शोषितांच्या भावना, व्यथा व वेदना आपल्या क्रांतीगीतातून शब्दबद्ध केल्या. "ज्ञानाच्या भाल्याचा वार केला, भीमाने मनुला ठार केला", अशी प्रगल्भ जाणीव राजानंदांनी प्रदीप्त केली. माणूस म्हणून जगणे हे महत्त्वाचे आहे, असे ते मानत. त्याकरिता धम्म महत्त्वाचा आहे असे ते म्हणताना म्हणतात, की "माणूस म्हणून मला जगाचा धम्म दिला, बावीस प्रतिज्ञा, पाळून पंचशील, देव, आत्मा, पुनर्जन्म राजानंद मानीत नाही, भीम माझा बाप अन् आई, भीम माझा सर्वकाही।।" बाबासाहेबांच्या कार्याला गतिमान करणे आवश्यक असून फक्त इतिहासाचे गुणगान करण्यात अर्थ नाही, असे विचार राजानंद यांनी प्रसृत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विश्वशांतीचे मर्म जाणून बुद्धाचा मानवधर्म दिला. या बाबासाहेबांच्या पवित्र कार्याचे पालन करा, असे आवाहन ते करतात. माणसापासून दूर गेलेल्यांना बाबासाहेबांनी माणसात आणले, अशी मानवतावादी दृष्टी राजानंदांनी व्यक्त केली.

राजानंदांनी स्वाभिमान जागवित लोकशाही मूल्यांचे बीजारोपण केले. चळवळीतील ऐक्य अभंग राखण्याचे आवाहन केले. धारदार लेखणीने समाज जागृतीचे ऐतिहासिक कार्य केले. निर्भीड लेखन केले. भीम स्तवनातून आंबेडकरांच्या जीवनवृत्ताचे कथन केले. "भीम माऊलीच्या ममतेपुढे, आभाळाचे पांघरून अपुरे पडे", असा बाबासाहेबांच्या ममत्वाचा साक्षात्कार राजनंदांनी घडविला. राजानंदांनी विपुल काव्यरचना केली. 'गीत भीमायन' हे पहिले पुस्तके त्यांचे असून जवळ-जवळ पंधरा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

राजानंदांची 'सोनबा येवलेची कथा' म्हणजे आंबेडकरांवर निःस्सीम श्रद्धा असलेल्या एका सामान्य दलित व्यक्तीची सत्यकथा होय. 'पटाचाराची कहानी' ही रचना अतिशय लोकप्रिय आहे. 'शिका संघटित व्हा संघर्ष करा रे, बना स्वावलंबी स्वयंदीप व्हारे, कार्यरथाला मिळूनिया सारे पुढे न्या, पण मागे ओढू नका रे, सांगितले हे जाता-जाता, भीमराव हा दलितांचा दादा" ही राजानंदांची रचना बाबासाहेबांचा संदेश समाजात रूजविणारी आहे. जातीयवाद्यांनो आम्ही आता अज्ञानी आणि अंध नाही याची सजग जाणीव राजानंदांनी करून दिली. नवा इतिहास बुद्ध धम्माच्या तत्त्वांनी घडविला यावरही ते भाष्य करतात.

सहा डिसेंबर एकोणविसशे पच्चावन साली चैत्य भूमीवर रिपब्लिकन पक्षाची ऐक्य सभा झाली. गटबाजीच्या गाठी सुटल्या आणि हर्षाच्या लाठी सुटल्या, अशी राजानंदांची मांडणी म्हणजे त्यांना अभिप्रेत असलेल्या ऐक्याची नांदीच वाटते. घाटकोपर, रमाबाई नगर, मुंबई येथे झालेल्या दंगलींचे राजानंदांनी केलेले चित्रण मनाला चटका लावणारे आहे. डॉ.कृष्णा किरवले म्हणतात त्याप्रमाणे "कशास देता भीमास अग्नी आज। जळला जन्मभरी भीमराव", असे आंबेडकरांच्या जळत्या जीवनप्रवासाचे चित्रण करून शोकात बुडालेल्या मनाचे गडपायले ह्यांनी केलेल्या वर्णनामुळे वाचकांचेही मन हेलावल्याशिवाय राहत नाही." राजानंदांनी चळवळीचे केलेले आत्मपरीक्षण विचार करायला लावणारे आहे. आंबेडकरी चळवळीकरिता जगलेले राजानंद गडपायले यांचे वृद्धापकाळाने ९ जानेवारी २००० रोजी निधन झाले.

## वाचक विचार मंच

# एकीकडे दिलदारपणा, तर दुसरीकडे अरेरावी!

प्रसारमाध्यमांतून सध्या दोन बातम्या लक्ष वेधून घेत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या आयसीसी टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेमध्ये भारतीय संघाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत विश्वविजेतेपद पटकावले आणि विश्वविजेत्या भारतीय संघावर पैशांचा अक्षरशः वर्षाव झाला. या ऐतिहासिक कामगिरीसाठी क्रिकेटविश्वातील अतिश्रीमंत असलेल्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) भारतीय संघाला तब्बल १२५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले. यातील प्रत्येकी ५ कोटी रुपये १५ खेळाडू आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांना देण्यात येणार होते. मात्र, मला प्रशिक्षक चमूमधील इतर सदस्यांना मिळणाऱ्या रकमे एवढीच म्हणजे २.५ कोटी रुपये रक्कम देण्यात यावी अशी विनंती करत उर्वरित अडीच कोटी स्वीकारण्यास नम्रपणे नकार देऊन राहुल द्रविड यांनी आपल्या दिलदार स्वभावाचे दर्शन घडवले. दुसरीकडे राज्यातील वादग्रस्त प्रशिक्षणार्थी परिविक्षाधीन आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांनी प्रशिक्षणाच्या काळातच पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कायद्यात तरतूद नसतानादेखील स्वतंत्र कार्यालय, अंबर दिवा लावलेली गाडी, बंगला, कर्मचारी अशा अवास्तव मागण्या केल्या आणि त्या मागण्या करताना अरेरावीचे आणि असभ्यतेचे वर्तन केले.

**प्रदीप शंकर मोरे**, मुंबई
मो. नं.: ९८७०७७७२७४

## शिक्षणासाठी मदत असावी!

पूर्वी आर्थिक अडचणीत असल्याने शिक्षण थांबत असल्यास मदत मिळत असे. आताही काही संस्था, तसेच वैयक्तिक पातळीवर काही व्यक्ती मदत करतात. त्याची माहिती सोशल मीडियावर येते. वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य दिले जाते. याची माहिती मुलांना व पालकांना असावी. अनेक हुशार मुले दहावीनंतर पुढे शिकू शकत नाहीत कारण परिस्थिती प्रतिकूल असते.

**प्र.मु. काळे** नाशिक
मो. नं.: ९२७३०४५७९४

## धुमस

**पंचतारांकित**

निवडणूक जिंकल्यावर
कसा काय असर पडतो?
खुद्द नेत्याला मतदारांचा
का बरं विसर पडतो?

ह्यांच्यासाठी कार्यकर्ते
राब राब राबत असतात
पण पंचतारांकित हॉटेलात
ते सांगा कुठं दिसतात?

हॉटेल, झाडी, डोंगर
सुरत, गोवा, गुवाहाटी
सर्वकाही ओके असते
ते फक्त नेत्यांसाठी

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## जग भ्रमंती

# सर्वात उंच पर्वत रांगा

आपल्या देशाची भौगोलिक रचना बघता भारतात हिमालय, सह्याद्री, सातपुडा, अरावली अशा अनेक जुन्या-नव्या पर्वत रांगा आहेत. जगातलं सगळ्यात उंच ठिकाण कुठलं असा प्रश्न तुम्हाला विचारला, तर तुम्ही हिमालय म्हणाल; पण जगातले सगळ्यात उंच पर्वत भारताच्या आसपास आहेत. चला तर, मग जाणून घेऊ या जगातील उंच पर्वतांबाबत..

**माऊंट एव्हरेस्ट** : नेपाळ आणि चीनच्या सीमेवर असणाऱ्या या सर्वोच्च पर्वतशिखराची नवी उंची पूर्वीपेक्षा ८६ सेंटीमीटर्स जास्त आहे. पूर्वीच्या मोजदादीनुसार ही उंची ८,८४८ मीटर होती. या उंचीमध्ये शिखरावरचे बर्फाच्छादित टोकही (SnowCap) मोजण्यात आलेय. पर्वतावरच्या बर्फाच्छादित टोकाची उंची मोजण्याच्या पद्धतीवरून चीन आणि नेपाळचे एकमत होत नव्हते. सर्व्हे ऑफ इंडियाने ठरवलेली एव्हरेस्टची उंची ही जगभर प्रमाण म्हणून स्वीकारली जात होती, पण त्या उंचीपेक्षा एव्हरेस्टची उंची ४ मीटरने कमी असल्याचे चीनचे आतापर्यंत म्हणणे होते. माऊंट एव्हरेस्टला नेपाळमध्ये सागरमाथा, तर तिबेटमध्ये चोमोलुंग्मा म्हटले जाते.

**कंचनजंघा २**: भारताशेजारील पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये येणारा कंचनजंघा २ हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा उंच पर्वत आहे. के २ या नावाने ओळखला जाणारा हा पर्वत ८,६११ मीटर उंच आहे. याची व्याप्तीही खूपच मोठी आहे.

**कंचनजंघा**: हिमालय पर्वतांतील एक उंच पर्वतशिखर आहे. हे जगातील माऊंट एव्हरेस्ट व के २ यांच्यानंतरचे तिसरे सर्वात उंच शिखर आहे. हे भारताच्या सिक्कीम राज्यात असून भारतीय भूमीतील सर्वोच्च शिखर आहे. याची उंची ८,५८६ मीटर (२८,१६९फूट) इतकी आहे. याचे खरे स्थानिक लिम्बू भाषेतील नाव सेवालुंग्मा असे आहे, तर किरन्त धर्मात सेवालुंग्मा म्हणजे धार्मिक असे समजले जाते.

**ल्होत्से**: ल्होत्से (नेपाळी) हा पृथ्वीवरचा चौथा अत्युच्च पर्वत असून तो दक्षिण कोल मार्गे माऊंट एव्हरेस्टला जोडलेला आहे. ल्होत्सेचे सर्वोच्च शिखर समुद्रसपाटीपासून ८,५१६ मीटर (२७,९४० फूट) आहे. जवळची शिखरे अनुक्रमे ल्होत्से मध्य (पूर्व) ८,४१४ मीटर (२७,६०५ फूट) व ल्होत्से शार ८,३८३ मीटर (२७,५०३ फूट) उंच आहेत. ल्होत्से पर्वत तिबेट व नेपाळचा खुम्बू भाग यांच्या सीमेवर आहे. या 'साउथ कोल'ची उंची देखील ८ हजार मीटरहून अधिक आहे. १९५६ साली फ्रित्झ लुशिगर व अर्नेस्ट रीस या स्विस गिर्यारोहकांनी या शिखरावर सर्वात पहिली यशस्वी मोहीम केलीय.

**मकालू**: माउंट एव्हरेस्टपासून फक्त १९ किलोमीटर अंतरावर हा मकालू पर्वत आहे. मकालू हे हिमालयातील एक शिखर आहे. त्याची उंची ८४६३ मीटर असून ते जगातील पाचव्या क्रमांकाचे उंच शिखर आहे. हे शिखरदेखील 'माउंट एव्हरेस्ट'च्या हिमालयीन रांगांमध्ये वसलेले आहे. १५ मे इ.स. १९५५ रोजी लिओनेल टेरे व जिन कुझी यांची फ्रेंच मोहीम सर्वप्रथम या शिखरावर दाखल झाली. २०१४ साली 'गिरीप्रेमी'च्या संघाने या शिखरावर यशस्वी चढाई केलीय.

## गुल्लेर



नरेंद्र इंगळे
9561226572

# टाका रिचार्ज

'कोनाचा फोन होता सुभासभाऊ?'

'बायकोचा..! रिचार्ज टाका म्हनते माह्या याच्यात.'

'रिचार्ज मोठा महाग झाला.. दोनशात अठराच दिवस येऊन राह्यले.'

'त्या अंबानीच्या पोराचं लगन आहे म्हनतात परदेशात.. त्याचा सगळा खर्च तो आपल्याजवळून काढून राह्यला.'

'असा कोनता खर्च करून राह्यला लेक?'

'तो आता सगळं वऱ्हाड इमानात बसून नेईन..फाईव्ह स्टार हाटेलीत मुक्काम.. जे नाही ते खायाले.. पाच- पाच हजाराची एक एक व्हिस्कीची बाटली.. नाचाले हॉलीवूडच्या हिरोईना.. चार-पाच दिवस रंग आहे त्याहिचा.'

'हे म्हनजे लयलूट लावली.. आगुदर लोकाईले हरकून देलं.. आता अशी गोठ झाली की, अटकली खुटी त जाशीन कुठी.'

'बरं याच्यावर कोनी बोलत नाही.. कांद्याचे भाव वाढले की बातच बोंबलतात.'

'आता माह्या घरी चार मोबाईल आहेत. बायकोचा अलग.. पोरापोरीचा अलग..एकाएकाले वर्षाचा चार हजाराचा रिचार्ज मारा लागते. सोळा हजार याच्यातच चालले.'

'चार मोबाईलचं कामही नाही. वैनीले कायले पाह्यजे मोबाईल? घरीच असते दिवसभर.'

'अरे तिले चार बहिनी आहेत. रोजचे फोन सुरू असतात. निरा चिल्लर बोलतात.. जेवली काय? कायची भाजी केली? तुही कंबर दुखते काय? त्या ढमकीले पोरगं झालं.. भाजीची लय पंचाईत होते.. राती आमच्या घरापाशी कुत्रे भुकत..अशा चिल्लर गप्पा चालतात. त्यातली कामाची एकही गोष्ट नसते. तेवढ्यासाठी तिले पेशल मोबाईल लागते.'

'तुमचा मोबाईल देत जा वैनीले.'

'मी बाहीर राह्यतो.. ते म्हनते मले पेशल पाह्यजे. भांडते माह्याशी.'

'आता एकनाथभाऊ दीड हजार रुपये मयना सुरू करुन राह्यले.. त्यातूनच सगळा खर्च निंगते..तुमाले टेन्शनच नाही.'

'त्याचं काही खरं आहे काय? निवडणुकीसाठी जलवा सुरूआहे. तीन कोटी बायाईले दर मयना पैसे कुठून देतीन?'

'अमेरिकेनं भारताले कर्ज देलं की झालं.. नाहीतरी भारत कर्जातच डुबेल आहे.'



## ७ भारतीयांसह ६५ जण बेपत्ता
## चितवन परिसरातील घटना

# नेपाळमध्ये भूस्खलन; २ बस वाहून गेल्या

वृत्तसंस्था

**काठमांडू :** नेपाळमधील चितवन परिसरात भूस्खलनानंतर दोन बस त्रिशूली नदीत वाहून गेल्याने ७ भारतीय नागरिकांसह किमान ६५ लोक बेपत्ता असल्याचे वृत्त पीटीआयने दिले आहे. मीडिया रिपोर्ट्सचा हवाला देत वृत्तसंस्थेने म्हटले आहे की, काठमांडूहून निघालेली एंजल बस आणि गौरकडे जाणारी गणपती डिलक्स बसचा शुक्रवारी पहाटे ३.३० च्या सुमारास अपघात झाला. नारायणघाट-मुगलिंग रस्त्यालगत सिमलताल परिसरात दरड कोसळल्याने प्रवाशांसह दोन्ही बस नदीत वाहून गेल्या. मायरिपब्लिका न्यूज पोर्टलने दिलेल्या माहितीनुसार, बेपत्ता प्रवाशांमध्ये ७ भारतीय नागरिकांचा समावेश आहे. एंजेल बसमध्ये २४ तर गणपती डिलक्समध्ये ४१ जण होते, असे पोलिसांनी सांगितले. गौरकडे जाणाऱ्या बसमधील तीन प्रवासी वाहनातून उडी मारून पळून जाण्यात यशस्वी झाले, असे अहवालात म्हटले आहे.

### बचावकार्यासाठी पोलीस, सशस्त्र दलाची मदत

चितवनचे मुख्य जिल्हा अधिकारी इंद्रदेव यादव यांनी सांगितले की, बचावकार्य सुरू असून, भूस्खलनाचा ढिगारा हटवला जात आहे. बचावकार्यासाठी पोलीस आणि सशस्त्र दलही सहभागी झाले आहेत. नेपाळचे पंतप्रधान पुष्पकमल दहल प्रचंड म्हणाले की, त्यांनी तातडीने शोध आणि बचाव कार्यासाठी निर्देश जारी केले आहेत. देशभरात नुकत्याच आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात मालमत्तेचा नाश झाला आणि भूस्खलनात प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले हे ऐकून मला खूप वाईट वाटले. नारायणगड-मुग्लिन मार्गावर भूस्खलनात बस वाहून गेल्याच्या दुःखद घटनेने मला खूप वाईट वाटले. मी स्थानिक प्रशासनासह सरकारच्या सर्व एजन्सींना प्रवाशांचा शोध आणि प्रभावीपणे सुटका करण्याचे निर्देश दिले आहे' असे प्रचंड यांनी वर पोस्ट शेअर करून सांगितले.

# कॅनडातील २० वर्षीय तरुणीला पेट्रोल पिण्याचे व्यसन!

**मॉंट्रियल :** जगाच्या पाठीवर विचित्र लोकांची अजिबात वानवा नाही. अनेकांना खाण्यापिण्याच्या विचित्र सवयी असतात. काहींमध्ये त्या एखाद्या दुर्मिळ विकारामुळेही आलेल्या असतात, तर काहींची ही मानसिक समस्याही असते. कुणाला नट-बोल्ट खाण्याची सवय असते, तर कुणाला चक्क भिंतीचे पापुद्रे! आतापर्यंत तुम्ही विविध प्रकारच्या व्यसनांबद्दल ऐकले किंवा वाचलले असेल. मात्र, कॅनडातील २० वर्षीय शेनॉन या तरुणीला चक्क पेट्रोल पिण्याचे विचित्र व्यसन जडले आहे.

पेट्रोल प्यायल्याने माझा मानसिक ताण कमी होतो, असे या तरुणीचे म्हणणे आहे. अशा प्रकारे पेट्रोल प्यायल्याने शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतात, असा



इशारा डॉक्टरांनी अनेकदा या महिलेला दिला आहे. अशीच पेट्रोल पित राहिलीस तर यामुळे तुझा लवकरच मृत्यू होईल, इथपर्यंत डॉक्टरांनी या महिलेला सांगितले आहे. मात्र, या २० वर्षीय शेनॉन नावाच्या तरुणीला पेट्रोलचे व्यसन सोडता येत नाही आहे. कॅनडामधील ओंटारिओ प्रांतात राहणारी शेनॉन रोज सकाळी उठल्यानंतर तिच्या बाथरूममध्ये ठेवलेला लाल रंगाचा पेट्रोलचा प्लॅस्टिकचा डब्बा तोंडाला लावते, असे 'द सन'ने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.

# चीनमधील धरणामुळे अवघ्या पृथ्वीलाच धोका

वृत्तसंस्था

**बीजिंग :** चिन्यांचे अनेक कारनामे हे जगाला धोक्यात टाकत असतात. कोरोना महामारी हे त्याचे अलीकडचे एक ताजे उदाहरण आहे. चीनमधील एका धरणामुळेही पृथ्वीला धोका निर्माण झालेला असल्याचे तज्ज्ञ सांगतात. जगातील सर्वात मोठे धरण हे चीनमध्ये आहे. थ्री गॉर्जेस डॅम असे या धरणाचे नाव आहे. हे धरणच पृथ्वीसाठी धोक्याची घंटा ठरत आहे.

या धरणामुळे पृथ्वीच्या फिरण्याचा वेग थोडा कमी झाला आहे. एका दिवसाचा वेळ सुमारे ०.०६ मायक्रो सेकंदांनी वाढला आहे. या धरणात इतके पाणी जमा झाले की, पृथ्वीच्या जडत्वावर याचा परिणाम झाला आहे. या धरणामुळे पृथ्वीवर अनेक संकट ओढावू शकतात. हे धरण २.३ किलोमीटर लांब, ११५ मीटर रुंद आणि १८५ मीटर उंच आहे. या धरणाच्या जलाशयात ४२ अब्ज टन पाणी आहे. धरण परिसरात ६४०० वनस्पती प्रजाती, ३४०० कीटक प्रजाती, ३०० माशांच्या प्रजाती आणि ५०० पेक्षा जास्त स्थलीय पृष्ठवंशीय प्रजाती आहेत. या बंधाऱ्यामुळे या सर्व प्रजाती धोक्यात आल्या आहेत. या धरणामुळे



दुष्काळ आणि रोगराईही वाढली आहे. तसेच या धरणामुळे पृथ्वीचे उत्तर आणि दक्षिण ध्रुव एकमेकांपासून दूर गेले असल्याचेही सांगितले जाते. या धरणाच्या बांधकामामुळे उत्तर आणि दक्षिण ध्रुव आपापल्या ठिकाणाहून प्रत्येकी २ सेमी सरकले आहेत. नासाच्या शास्त्रज्ञांनी २००५ मध्येच थ्री गॉर्जेस धरणामुळे पृथ्वीच्या फिरण्याचा वेग कमी होण्याचा अंदाज वर्तवला होता. वस्तुमानातील बदलामुळे एका दिवसाची वेळ ०.०६ मायक्रो सेकंदांनी वाढली आहे. जगातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प याच धरणावर आहे. हे धरण दोन मोठ्या फॉल्ट लाईनवर बांधले आहे, त्यामुळे येथे अनेक वेळा भूकंप होतात.

# खदानीत डम्पर कोसळून दोघांचा मृत्यू

**पालघर :** वसई पूर्वेकडील नवजीवन परिसरात गावदेवी डोंगराच्या मागच्या बाजूस असणाऱ्या बेकायदेशीर खदानीत दोनशे फूट खोल डम्पर कोसळून भीषण अपघात होऊन त्यात एका लहान मुलासह डम्पर चालकाचा मृत्यू झाला आहे. समद शेख (२३) असे डम्पर चालकाचे नाव आहे. तर १३ वर्षांचा नरेश पवार याचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी मयत चालक समद शेख याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खैरपाडाच्या मागील बाजूला नवजीवन परिसरात बंद असलेल्या खदानीच्या डोंगरावरून समद शेख डम्पर घेऊन घरी निघाला होता. सोबत नरेश पवारदेखील



होता. डोंगरावरून डम्पर घेऊन जात असताना जमीन भुसभुशीत असल्याने चालक समद शेख याचा डम्परवरील ताबा सुटल्याने डम्पर थेट दोनशे फूट खोल खदानीत कोसळला. या भीषण अपघातात डम्परच्या पत्र्यात अडकल्याने नरेश पवारचे अक्षरशः तुकडे झाले होते. तर गंभीर जखमी समद शेख याचा रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला.


# अरुणाचलवर भारताचा अधिकार नाही : चीन

वृत्तसंस्था

**बीजिंग :** अरुणाचल प्रदेश या राज्यात १२ जलविद्युत प्रकल्पांच्या निर्मितीला वेग देण्यासाठी केंद्र सरकार एक अब्ज डॉलर्स खर्च करण्याची योजना आखत आहे. यावरून चीनने कठोर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. चीनच्या विदेश मंत्रालयाने भारताला अरुणाचल प्रदेशात विकासकामे करण्याचा कुठलाच अधिकार नसल्याचा दावा केला. चीन अरुणाचलला दक्षिण तिबेट संबोधून त्यावर स्वतःचा दावा सांगत आहे.

अरुणाचल प्रदेशात १२ जलविद्युत प्रकल्पांच्या निर्मितीत

### जलविद्युत प्रकल्पांवरून जळफळाट



वेग आणण्यासाठी भारत एक अब्ज डॉलर्स खर्च करण्याची योजना आखत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या नेतृत्वाखालील अर्थ मंत्रालयाने अलीकडेच ईशान्येतील जलविद्युत प्रकल्पांसाठी ७.५ अब्ज रुपयांच्या आर्थिक सहाय्याला मंजुरी दिली आहे. या योजनेच्या अंतर्गत अरुणाचल प्रदेशात १२ जलविद्युत प्रकल्पांसाठी सुमारे ९० अब्ज रुपये उपलब्ध करून दिले जाणार आहेत. या निधीतून राज्य सरकारला स्थानिक लोकांचे पुनर्वसन करण्यास मदत मिळणार आहे. जलविद्युत प्रकल्पांची घोषणा २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात केली जाण्याची अपेक्षा आहे. भारत सरकार २३ जुलै अर्थसंकल्प सादर करणार आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये भारत सरकारने सीमाक्षेत्रात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एक व्यापक योजनेच्या हिस्स्याच्या स्वरुपात ११.५ गीगावॅट क्षमतेच्या प्रकल्प आहे.

# काझीरंगानात १५० प्राण्यांनी गमाविला जीव

**गुवाहाटी :** आसाममध्ये पुरामुळे मनुष्य तसेच प्राण्यांनाही जीवाला मुकावे लागले आहे. पुरामुळे अनेक प्राण्यांचाही मृत्यू ओढवला आहे. काझीरंगा राष्ट्रीय उद्यानात १५० हून अधिक प्राणी पुराच्या पाण्यात बुडाले असू यात ९ दुर्लभ एक शिंगी गेंडेही सामील असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

आसाम मागील दोन महिन्यांपासून पूरसंकटाला सामोरा जात आहे. पुरात कमीतकमी ७९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर हजारो लोक विस्थापित झाले आहेत. पुरामुळे काझीरंगा राष्ट्रीय उद्यानाचा एक तृतीयांश हिस्सा पाण्यात बुडाला आहे.

# अबू बकर अल-बगदादीच्या पत्नीला मृत्युदंड

### इराकच्या न्यायालयाने ठोठावली शिक्षा

वृत्तसंस्था

**बगदाद :** इराकच्या एका न्यायालयाने इस्लामिक स्टेटचा माजी प्रमुख अबू बकर अल-बगदादीची पत्नी अस्मा मोहम्मदला मृत्युदंड ठोठावला आहे. अस्मा मोहम्मदला यझिदी महिलांच्या अपहरणात बगदादीला साथ दिल्याप्रकरणी दोषी ठरविण्यात आले आहे. अबु बकर अल-बगदादी हा २०१४ पासून इस्लामिक स्टेटचा म्होरक्या होता, अमेरिकेने २७ ऑक्टोबर २०१९ रोजी विशेष मोहिमेद्वारे सीरियात घुसून बगदादीचा खात्मा केला होता. त्याची पत्नी अस्माला दहशतवादविरोधी कायद्याच्या अंतर्गत ताब्यात घेण्यात आल्याचे इराकच्या सुप्रीम ज्युडिशियल कौन्सिलने सांगितले आहे.

अस्माने यझिदी महिलांना स्वतःच्या घरात लपविले आणि मग त्यांना इस्लामिक स्टेटच्या दहशतवाद्यांच्या स्वाधीन केले होते. इस्लामिक स्टेटच्या दहशतवाद्यांनी यझिदी महिलांवर प्रचंड अत्याचार केले होते. अल बगदादीने २०१४ मध्ये इस्लामिक स्टेट ही दहशतवादी संघटना निर्माण केली होती, त्यानंतर त्याने सीरिया आणि इराकच्या एका मोठ्या भूभागावर कब्जा केला होता.



पुणे : एसटी महामंडळातर्फे सोमवारी १५ जुलैपासून प्रवासी आणि कामगाराच्या समस्या, तक्रारी, सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निकालात काढण्यासाठी आगारनिहाय 'प्रवासी राजा दिन' तसेच, 'कामगार पालक दिन' आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत संबधित विभागाचे विभाग नियंत्रक हे वेळापत्रकानुसार एका आगारामध्ये जाऊन प्रवासी तसेच एसटी कामगाराच्या सामान्य जाणून घेणार आहेत.

# आयआयटीमध्ये आता हिंदीत इंजिनीयरिंगचे शिक्षण

वृत्तसंस्था

**जोधपूर :** भारतीय तंत्रज्ञान संस्थेत (आयआयटी) आता इंजिनीयरिंगचे शिक्षण हिंदीतही सुरू होणार आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय आयआयटी जोधपूरमध्ये चालू शैक्षणिक सत्रापासूनच हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये बीटेक पहिल्या वर्षासाठी अभ्यास क्रम सुरू करणार आहे. हा नवा पुढाकार स्वतःच्या मातृभाषेत विद्यार्थ्यांना प्रभावीपणे शिक्षण घेता यावे याकरिता घेण्यात आल्याचे शिक्षण मंत्रालयाने सांगितले आहे. जे शिक्षक इंग्रजी विभागाला शिकवतील, तेच हिंदीतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकविणार आहेत. यामुळे निरंतरता

### बीटेकमध्ये याच वर्षापासून सुविधा लागू

आणि गुणवत्ता कायम राहणार आहे. आयआयटी जोधपूरमध्ये अधिक समावेशक आणि सहाय्यक शैक्षणिक वातावरणाला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या शिफारसींनुसार विद्यार्थ्यांना स्थानिक भाषेत इंजिनीयरिंग आणि वैद्यकीय शिक्षणाचा पर्याय उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत; परंतु अद्याप बहुतांश विद्यार्थी इंग्रजी माध्यमातील अभ्यासक्रमांची निवड करत आहेत.

# 2 महिन्यांत 93 बालकांचा मृत्यू

### मध्य प्रदेशातील पन्ना जिल्ह्यातील दुरावस्था

वृत्तसंस्था

**इंदूर :** मध्य प्रदेशातील पन्ना जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा पूर्णतः मोडकळीस आली आहे. एका धक्कादायक अहवालानुसार पन्ना जिल्ह्यात १ एप्रिल २०२४ ते ३१ मे २०२४ पर्यंत एकूण ९३ बालकांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी सर्वाधिक ६९ बालकांचा जन्मानंतर एका महिन्यातच मृत्यू झाला. तर १५ मुले जन्मानंतर एक वर्षही जगू शकली नाहीत. १ ते ५ वर्षे वयोगटातील ९ बालकांच्या मृत्यूचीही नोंद झाली आहे. बालमृत्यू रोखण्यासाठी जिल्ह्यात सुरू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या योजनेचे वास्तव पन्ना जिल्ह्याच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. त्याचबरोबर बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यात यश आल्याचे सरकारचे दावेही किती फोल आहेत हे देखील उघड झाले आहेत.

# प्रसिद्ध आजोबा देवस्थानचा होणार कायापालट

**पणजी :** तमाम सत्तरीवासीयांचे श्रद्धास्थान, केरी-सत्तरी येथील प्रसिद्ध श्री सातेरी आजोबा देवस्थानच्या दुरुस्ती आणि सौंदर्यीकरणासाठी राज्य सरकारने २.५० कोटी रुपये मंजूर केले आहेत. याबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याने वर्क ऑर्डर जारी असून कंत्राटदाराला हे काम मान्सून कालावधीत धरून ३३० दिवसांत पूर्ण करावे लागेल.

# रेल्वेचा विनातिकिट प्रवाशांवर बडगा

वृत्तसंस्था

**मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील लोकल, रेल्वेगाड्यामधून मोठ्या संख्येने विनातिकिट प्रवासी प्रवास करीत असून त्यामुळे तिकिटधारक प्रवाशांचा प्रवास गैरसोयीचा होत होता. त्यामुळे तिकिटधारक प्रवाशांकडून वारंवार तक्रारी करण्यात येत आहे.

या तक्रारींची दखल घेत पश्चिम रेल्वे प्रशासनाने विविध तपासणी अभियान राबवून एप्रिल ते जून या तीन महिन्यात ७.८४ लाख विनातिकिट प्रवाशांची धरपकड केली. त्यांच्याकडून ५२.१४ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला.

मुंबई उपनगरीय विभागात विनातिकिट प्रवाशांकडून वसूल करण्यात आलेल्या १४.६३ कोटी रुपये दंडाचा त्यात समावेश आहे. पश्चिम रेल्वेवरील तिकिटधारक प्रवाशांचा प्रवास आरामदायी होण्यासाठी आणि प्रवाशांना अधिकाधिक सुविधा पुरवण्यासाठी पश्चिम रेल्वे प्रयत्नशील आहे. लोकल, मेल-एक्स्प्रेस, पॅसेंजर आणि सुट्टीकालीन विशेष रेल्वेगाड्यांमधून तिकिट तपासणी मोहीम सुरू आहे.

### ५२ कोटी रुपये दंड वसूल

पश्चिम रेल्वेच्या वाणिज्य विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एप्रिल ते जून या कालावधीत तिकिट तपासणी करून ५२.१४ कोटी रुपये दंड वसूल केला. तर, जून २०२४ मध्ये आरक्षित न केलेले सामान घेऊन जाणाऱ्या २.२५ लाख विनातिकिट प्रवाशांवर कारवाई करून १४.१० कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच वातानुकूलित लोकलमधून विनातिकिट प्रवास करणाऱ्या १३ हजार प्रवाशांचीही धरपकड करण्यात आली असून त्यांच्याकडून ४३.६४ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला.

### तक्रारीची दखल



# फ्रान्समधील प्राचीन तलवारीचे चोरी

### १३०० वर्षे जुनी एक्सकॅलिबर तलवार

**पॅरीस :** फ्रान्सची प्राचीन तलवार १३०० वर्षांनी अचानक गायब झाली आहे. एक्सकॅलिबर नावाच्या प्राचीन तलवारीला जगातील सर्वाधिक धार आणि कधीच न नष्ट होणारी तलवार मानले गेले होते. ही तलवार १३०० वर्षांपेक्षा अधिक काळापासून एका दगडात रोवण्यात आली होती. तलवार दगडातून कुणी काढली याची कुठलीच माहिती सध्या पोलिसांकडे नाही. ही तलवार जमिनीपासून खूप अधिक उंचीवर असल्याने ती कशाप्रकारे काढली गेली असावी असा प्रश्न पोलिसांना पडला आहे. पोलिसांनी याला चोरी मानत तपास सुरू केला आहे. ही तलवार एका वारमध्ये विशाल दगडांनाही तोडण्यास सक्षम होती, असे बोलले जाते. या डूरंडल तलवारीला लोकप्रिय स्वरुपात फ्रेंच एक्सकॅलिबर नावानेदेखील ओळखले जाते. राजा आर्थरने या तलवारीला दगडातून बाहेर काढले होते. वदंतेनुसार आठव्या शतकात एका देवदूताने रोमन सम्राट शारलेमेनला ही तलवार दिली होती. ११ व्या शतकातील एक कविता या तलवारीच्या जादुई क्षमतेचे वर्णन करते.

# गुहेत मिळाले ५१ हजार वर्षे जुने चित्र

### जगातील सर्वात प्राचीन कलाकृती

**इंडोनेशिया:** इंडोनेशियाच्या सुलावेसी बेटावर एका गुहेच्या छतावर प्राण्याच्या शिकारीचे प्राचीन चित्र आढळले आहे. दगडांवर तयार करण्यात आलेले हे ५१,२०० वर्षे जुने चित्र आहे. ही गुहा लाइमस्टोनद्वारे निर्माण झालेली आहे. या प्राचीन कलाकृतीत मानवाच्या आकृतीदेखील तयार करण्यात आलेल्या आहेत, या आकृती प्राण्याला घेरून त्याची शिकार करत असल्याचे दाखविण्यात आले आहे. ही जगातील सर्वात जुनी गुहा कलाकृती आहे. हे चित्र दक्षिण सुलावेसी प्रांताच्या



मारोस-पांगकेप भागाच्या लीयांग करमपुआंग गुहेत आहे. आता वैज्ञानिक या प्राचीन कलाकृतींचे वय जाणून घेण्यासाठी कॅल्शियम कार्बोनेट क्रिस्टलची मदत घेतात. ऑस्ट्रेलियाच्या ग्रिफित युनिव्हर्सिटीचे पुरातत्व तज्ञ मॅक्सिम ऑबर्ट यांनी नवे तंत्रज्ञान अधिक अचूक वय दर्शवित असल्याचे म्हटले आहे.

# मला भेटायचे असेल तर आधार कार्ड आणा!

वृत्तसंस्था

**मंडी :** भाजप खासदार आणि बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणावत या वादग्रस्त वक्तव्यामुळे नेहमीच चर्चेत राहिल्या आहेत. यातच आता कंगणा यांनी केलेले एक विधान चांगले चर्चेत आले आहे. मला भेटायचे असेल तर मंडी लोकसभा मतदारसंघाचे आधार कार्ड आणावे लागेल, तसेच, भेटण्यासंदर्भात कोणता विषय आहे, तोसुद्धा लेखी स्वरूपात घेऊन यावा, असे विधान कंगना यांनी केले आहे. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. कंगना

### कंगणाचे पुन्हा एकदा विधान चर्चेत



यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, माझे मंडी सदरमध्ये ऑफिस आहे हा त्याचा पत्ता आहे. येथे मोठ्या संख्येने पर्यटक येतात. अशा परिस्थितीत भेटायला येणाऱ्या लोकांना मंडी परिसराचे आधार कार्ड सोबत आणावे लागेल.

# हरियाणात बसप–आयएनएलडी आघाडी

### बसप लढविणार विधानसभेच्या ३७ जागा

वृत्तसंस्था

**चंदीगड :** हरियाणात लोकसभा निवडणुकीत एकही जागा जिंकू न शकलेल्या इंडियन नॅशनल लोकदलने विधानसभा निवडणुकीसाठी तयारी सुरू केली आहे. चालू वर्षात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी आयएनएलडी आणि बहुजन समाज पक्षादरम्यान आघाडी झाली आहे. या आघाडीच्या अंतर्गत आगामी विधानसभा निवडणुकीत आयएनएलडी ५३ तर बसप ३७ जागांवर निवडणूक लढविणार आहे.

आयएनएलडी आणि बसप यांच्या आघाडीचे सरकार सत्तेवर आले तर अभय चौताला यांना मुख्यमंत्री केले जाणार आहे. आघाडी अंतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे.

दोन्ही पक्षांच्या प्रतिनिधींनी चंदीगड येथे या आघाडीची औपचारिक घोषणा केली आहे. आयएनएलडी आणि बसप यांच्या आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा म्हणून अभय चौताला यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे.

# उत्कर्ष एनजीओला मानलं पाहिजे!

**वारी प्लास्टिकमुक्त करण्यासाठी भन्नाट कल्पना** • **कापडी पिशव्या व स्टील बॉटलचे करण्यात आले वाटप** • **पर्यावरणाच्या समतोलासाठी घेतलेला निर्णय यशस्वी** • **पर्यावरण संरक्षण चळवळीचा एक भाग**

अनिल चौधरी /पुणे

उत्कर्ष एनजीओने पंढरपूर वारी २०२४ प्लास्टिकमुक्त करण्यासाठी उत्कर्ष पर्यावरण वारी २०२४ लाँच केली.५ लाख कापडी पिशव्या आणि २.५ लाख स्टीलच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले पंढरपूर वारी ही एक आध्यात्मिक यात्रा आहे जिथे १० लाखांहून अधिक भाविक पंढरपूर मंदिराच्या पदयात्रेत सामील होतात, २९ जूनपासून सुरू झाली आहे आणि १७ जुलै २०२४ रोजी पंढरपूर येथे समाप्त होईल.

उत्कर्ष पर्यावरण वारी या वर्षीच्या वारीमध्ये सामील होत आहे, ज्यामध्ये उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, एक स्वयंसेवी संस्था, संपूर्ण मार्गावरील भाविकांना ५ लाख कापडी पिशव्या आणि २.५ लाख स्टीलच्या पाण्याच्या बाटल्यांचे मोफत वाटप करणार आहे. ही मोहीम उत्कर्ष से नो टू सिंगल-युज प्लास्टिक या मोहिमेचा एक भाग आहे जी सध्या पाच राज्यांमध्ये सुरू आहे.

उत्कर्ष देहू संस्थान, आळंदी संस्थान, सासवड, बारामती, फलटण, इंदापूर आणि पंढरपूर येथे



स्टॉल लावत आहे. २९ जून २०२४ रोजी उत्कर्ष ने पंढरपूर वारीच्या भक्तांना ५०,००० कापडी पिशव्या आणि ५०,००० स्टीलच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करून महाराष्ट्रातील देहू (श्री संत तुकाराम महाराज मंदिराजवळ) येथे मोहीम सुरू केली. ३० जून २०२४ रोजी उत्कर्षने आळंदी संस्थानमध्ये पोहोचून ५०,००० कापडी पिशव्या आणि ५०,००० स्टीलच्या पाण्याच्या बाटल्या भक्तांना वाटल्या.

४ जुलै २०२४ रोजी, उत्कर्ष सासवड ते जेजुरी वारी मार्गावर होता, आणि यात्रेकरूंना ५०,००० हून अधिक स्टीलच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले. ७ जुलै २०२४ रोजी उत्कर्षने बारामतीतील वारकऱ्यांना ५०,००० कापडी पिशव्या आणि ५०,००० स्टीलच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले. यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री अजित पवार जी उपस्थित होते. ११ जुलै २०२४ रोजी इंदापूर येथे उत्कर्ष स्टॉल उभारण्यात आला, जिथे त्यांनी वारकऱ्यांना ५०,००० स्टीलच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले.

१७ जुलै २०२४ रोजी, उत्कर्ष पंढरपूर येथे असेल आणि उत्कर्ष पर्यावरण वारी २०२४ चा एक मोठा समारोप समारंभ आयोजित करेल, आणि ५०,००० पेक्षा जास्त कापडी पिशव्यांचे वाटप भाविकांना करेल. ड. उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशनचे सीईओ डी.आर. लोंढे म्हणतात, उत्कर्ष पर्यावरण वारी २०२४ हा आमच्या एनजीओच्या पर्यावरण संरक्षण चळवळीचा एक भाग आहे. वारकऱ्यांना पंढरपूरच्या यात्रेत पोहोचवायचे आणि त्यांना प्लास्टिकच्या कॅरीबॅग आणि प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या वापरण्याची गरज पडू नये यासाठी कापडी पिशव्या आणि स्टीलच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्याचे आमचे ध्येय आहे. उत्कर्ष पर्यावरण वारी २०२४ चे उद्दिष्ट प्लास्टिक प्रदूषण कमी करणे आणि पंढरपूर वारी प्लास्टिकमुक्त करणे हे आहे! उत्कर्षचे उपाध्यक्ष आतिश पान २ वर...

## महाराष्ट्रात 'भारतरत्न संघर्ष' यात्रा काढणार

**अजिंक्य चांदणे : अण्णाभाऊ साठेंना भारतरत्न द्या!**




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना साहित्य क्षेत्रातील भारत रत्न देण्यात यावा,यासाठी महाराष्ट्रात भारतरत्न संघर्ष यात्रा काढणार असल्याची घोषणा डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी सोलापूर येथून केली.

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाची सोलापूर येथे राज्यस्तरीय महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा. यासाठी महाराष्ट्रात संघर्ष यात्रा काढली जाणार असल्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय डीपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत राज्यातून सर्व जिल्हाध्यक्ष व राज्य पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला. साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्रातील नामांकित साहित्यिक आहेत. पान २ वर...

# विद्यापीठाचा दिशाभूल करण्याचा प्रयत्न

**अरुण गाडे : मागासवर्गीय वरिष्ठ प्राध्यापकांचा छळ**

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे वरिष्ठ प्राध्यापकांनी कुलगुरू डॉ प्रशांत कुमार पाटील यांच्याद्वारे होत असलेल्या अन्यायाला दाद मागण्यासाठी सहकुटुंब आमरण उपोषण दिनांक १०जुलैपासून महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील कुलगुरूंच्या कार्यालयासमोर सुरू केले आहे. उपोषणाचा आज चौथा दिवस आहे. महाराष्ट्र कास्ट संघटना नागपूर अध्यक्ष यांनी कुलगुरू यांना दिनांक ६जुलै रोजी कुलगुरू यांना पत्र देऊन १२तारखेची वेळ मागितली होती तरीही कुलगुरू मुख्यालय हजर नव्हते. माझ्या शिष्टमंडळाने कुलसचिव यांच्याशी सर्व मुद्द्यांवर चर्चा केली. परंतु प्रशासन कोणताही ठोस निर्णय घेण्यास तयार नाही.

मागील दोन वर्षापासून कुलगुरू डॉ पाटील डॉ मिलिंद अहिरे यांना मानसिक त्रास देत आहे त्यांनी वरिष्ठ पदासाठी सहा विद्यापीठांमध्ये अर्ज केले होते. एखाद्या अधिकाऱ्याने वरिष्ठ पदासाठी किती अर्ज करावे याचे बंधन महाराष्ट्र शासनाने घातलेले नाही. असे असतानाही कुलगुरूंनी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेमध्ये असा ठराव केला की कोणी वरिष्ठ पदासाठी चार पेक्षा जास्त वेळा अर्ज करू शकत नाही. असा नियम भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांचा आहे पण तो महाराष्ट्र शासनासाठी नाही. फक्त विद्यापीठातील अधिकाऱ्यांना उच्च पदाची संधी मिळू नये म्हणून असा ठराव करण्यात आला होता.

डॉ अहिरे पाच वर्ष विभाग प्रमुख, तीन वर्ष सहयोगी अधिष्ठाता आणि १६वर्षापासून प्राध्यापक म्हणून काम करत आहेत. त्यांच्यावर पर्यंत कोणतीही चौकशी नाही. डॉ कांबळे व



### अन्याय दुर होईल पर्यंत उपोषण करणार

डॉ दिनकर कांबळे उच्च रक्तदाब व मधुमेह असल्याने व त्यांचा त्रास वाढल्याने तीन दिवसानंतर सोडले. प्रशासनाने या चा फायदा घेत त्यांना आपल्या बाबत विद्यापीठ चा अर्थ व शासनाच्या नियमाप्रमाणे निर्णय घेण्यात घेण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले जर उपोषण बेकायदेशीर आहे तर मग आश्वासन कसे दिले उपोषणकर्त्यांची कोणतीही मागणी पूर्ण न करता योग्य ते निर्णय घेऊ असे पत्र देत आहेत.डॉ अहिरे व त्यांचे कुटुंबीय त्यांना हे म्हणणे मान्य नाही त्यांनी केलेल्या मागणीप्रमाणे व कालावधी घालून मागणी पूर्ण करण्यात यावी व अंन्याय दूर करावा या मागणीवर ते ठाम आहेत

डॉ अहिरे यांचे पदोन्नतीचे प्रस्ताव २०२२ पासून तीन वेळा महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेला पाठवण्यात आले होते परंतु जानेवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने प्रस्ताव पुन्हा मागितल्यावर कुलगुरूंनी कार्यकारी परिषदेमध्ये असा ठराव केला की महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र ३ जुलै २०२३असाधारण क्रमांक २६९प्रमाणे ५०-५०प्रमोशन आणि सिलेक्शन मान्य नाही. कार्यकारी परिषद आशा राजपत्र विरुद्ध ठराव करू शकत नाही म्हणूनच तर तीन विद्यापीठांनी परिषदे कडे पाठवले .राहुरी विद्यापीठाला प्रस्तावा पाठवण्यासाठी चार पत्रे दिली आहेत परंतु या यादीमध्ये जास्त अधिकारी मागासवर्गीय असल्याने कुलगुरू महाराष्ट्र शासनाचा नाही नाही म्हणता या अधिकाऱ्यांना म्हणून दाबून ठेवत आहेत.उपोषण बेकायदेशीर कसे उपोषणकर्त्यांनी १०दिवसापूर्वी नोटीस दिली होती त्यामुळे उपोषण बेकायदेशीर म्हणणे चुकीचे आहे. सहा वर्षांपूर्वी डॉ दिनकर कांबळे कोल्हापुर असंताना एका खरेदी समितीमध्ये फक्त सदस्य होते पुरवठा दराने जीएसटी भरला नाही नंतर त्याने जीएसटी भरला अध्यक्ष, सचिव व लेखा विभाग यांची ही जबाबदारी होती तरीही डॉकांबळे यांना सदस्य म्हणून कारणे दाखवा नोटीस देण्यात आली व कोणतीही चौकशी नसताना चौकशी असल्याचे पत्र देण्यात आले. डॉ कांबळे यांना अडकवण्यासाठी चौकशी लावली आहे.

डॉ मिलिंद अहिरे यांनी कुलगुरूंनी केलेल्या अंन्याया विरुद्ध राष्ट्रीय , पान २ वर...

# राष्ट्रवादीने मुस्लिम चेहरा देण्याची मागणी!

**पडघम : शेख मंजूर ठरु शकतात प्रबळ दावेदार**

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात महाविकास आघाडीला दैदिप्यमान यश मिळालं आहे.या यशाचा खरा प्रमुख वाटेकरी मुस्लिम मतदार ठरला आहे. दरम्यान बीड जिल्ह्यातही भाजप महायुतीच्या प्रबळ उमेदवारासमोर मुस्लिमांनी तुतारीला तारलं आहे. त्यामुळे शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सहकार्याची परतफेड म्हणून माजलगाव मतदार संघासाठी मुस्लिम चेहरा देण्याची अपेक्षा आहे.मुस्लिम मतदारांचे संख्याबळ याठिकाणी निर्णायक आहे.त्यामुळे या भावना मुस्लिम समाजामधून व्यक्त होत आहेत.दरम्यान तूतारीला माजलगावात सर्वात प्रथम साथ देणारे,ज्यांची सामाजिक कार्यात ओळख आहे. ज्यांनी नगराध्यक्ष



पदाच्या कार्यकाळात शहर'विकास'करून दाखवला आहे.त्या नगराध्यक्ष शेख मंजूर यांची माजलगाव विधान सभेसाठी शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादीकडून प्रबळ दावेदारी मानल्या जात आहे.

शेख मंजूर यांनी शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची ताकत येथील प्रस्थापित नेत्यांसमोर प्रबळ करण्याचा प्रयत्न केला.मोर्चे, आंदोलने,मेळावे असे विविध कार्यक्रम आयोजित करत तुतारीवाला माणुस या चिन्हाची, पक्षाची जनजागृती,बांधनी त्यांनी मतदारसंघात केली.लोकसभा निवडणुकीत घरोघर पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करून विजय खेचून आणण्यात त्यांनी मोठे श्रम घेतले आहे.कर्तृत्वशील विकासशील नेतृत्व म्हणून त्यांच्या कडे पाहिल्या जातं.जे अनेक धुरंदरांना अचंबित करणारं आहे. जे येथील प्रस्थापितांना जमलं नाही,ते शेख मंजूर या तरुणाने शहरात करून दाखवलं.प्रशासकीय पकड, सर्वसामान्यांना सहज उपलब्ध होणारा'माणुस'ही त्यांची ठसठशीत ओळख याठिकाणी आहे.कामाचा झपाटा,सर्व समाजातील थोरामोठ्यांविषयी आदर, सर्वाविषयी असलेला शिष्टाचार, विश्वास,तरुणांसह ज्येष्ठ नागरिकांच्या मनात दरम्यानच्या काळापासून आजपर्यंत मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. आजच्या बदलत्या राजकीय समीकरणात अशा विकासशील नेतृत्वाला आमदारकीची संधी मिळाली तर निश्चितच ते मतदारसंघात विकास ,अशी चर्चा येत्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वत्र ऐकायला मिळत आहे.म्हणूनच त्यांची शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रबळ दावेदारी मानल्या जात आहे.मुस्लिम समाज अपेक्षा आहे राष्ट्रवादीने माजलगाव मतदार संघात मुस्लिम चेहऱ्याला उमेदवारी देण्याची मागणी होत आहे.

# आश्रमाला भेट देवून वृध्दृध्दांची विचारपूस!

**डॉ.अंजली घाडगे:आगामी काळात मदतीचे आश्वासन**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथील नेत्या तथा सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अंजलीताई घाडगे यांनी केज शहरापासुन जवळच असलेल्या बोबडेवाडी येथील स्वामी समर्थ वृद्ध आश्रमाला गुरुवारी भेट देऊन आश्रमातील वयोवृध्द पुरूष आणि महिला सोबत गप्पा मारुन त्यांच्या आरोग्याची चौकशी करुण या वृध्द आश्रमाला मदत ही देण्याचे आश्वासन डॉ. अंजलीताई घाडगे केज येथील अनुसुचित जाती मतदार संघातील नेत्या तथा सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अंजलीताई घाडगे यांनी मंगळवार, बुधवार, गुरुवार रोजी केज मतदार संघातील काही गावांना भेटी दिल्या. केज मतदारसंघात येत असलेल्या एका गावातील एका लग्न संमारंभाच्या ठीकाणी उपस्थित राहून नवनिर्वाचित



वधु वरांना शुभेच्छा देऊन केजकडे येत असताना त्यांनी केज पासुन जवळच असलेलाया बोबडेवाडी येथील स्वामी समर्थ वृध्द आश्रमाला भेट दिली असता स्वामी समर्थ वृध्द आश्रमाचे संस्थापक अध्यक्ष महादेव (बापू) कराड यांनी डॉ. अंजलीताई घाडगे यांच स्वागत केले. स्वामी समर्थ आश्रमातील वयोवृध्द पुरूष आणि महिला सोबत डॉ. अंजलीताई घाडगे गप्पा मारुन त्यांच्या आरोग्याची चौकशी करत असताना येथील वृध्द महीला अंजलीताईंना म्हणाल्या की तुमच्या वाढदिवसा निमीत्त तुम्ही पाठवलेल्या किराणा भेट वस्तू आम्हाला मिळाल्याची आठवण करुण दिली. या स्वामी समर्थ वृध्द आश्रमाला यापूढील काळात मदत ही देण्याचे आश्वासन डॉ. अंजलीताई घाडगे यांनी यावेळी दिले. पान २ वर...

## कोरडेवाडीत भाजपा कार्यकर्त्यांचा आनंदोत्सव



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी विधानपरिषद निवडणुकीत पहिल्या पसंतीची मते घेऊन दणदणीत विजय संपादन केला. या विजयानंतर जिल्ह्यासह वाड्या- वस्त्यात पंकजाताई समर्थकांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला. यावेळेस कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह उत्साह पाहवयास मिळाला. पंकजाताई मुंडे यांच्या विजयाकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. विजय जाहीर होताच राज्यभरातून हजारो कार्यकर्त्यांनी आपल्या ताई आमदार झाल्याबद्दल विजयोत्सव साजरा केला. अबालवृद्ध या विजयी क्षणाचे साक्षीदार होते. विडा परिसरात कोरडेवाडी येथील गावात तसेच बेंगळवाडी पान २ वर...

**दुर्घटना** | **बाल कल्याण समितीच्या आदेशाने गुन्हे**

# जिलेटीनच्या स्फोटात आयुष्याचं म्हात्र झालं!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज दहावीच्या वर्गातील मुलाला जिलेटीन स्फोट घेणाऱ्या ट्रॅक्टरवर कामावर ठेवले. नंतर कांड्या रोवताना अचानक स्फोट झाला आणि यात मुलाचा एक डोळा निकामी होऊन अंगठाही तुटला. शिवाय शरीराच्या विविध भागावर गंभीर जखमाही झाल्या. या प्रकरणात दोषींवर कारवाई करावी म्हणून आईने केज पोलिस ठाण्यात खेट्या मारल्या, परंतु, गुन्हा दाखल झाला नाही. अखेर आठवड्यापूर्वी दिव्यांग प्रमाणपत्र काढायला आल्यावर हा प्रकार उघड झाला. त्यानंतर आता तीन महिन्यांनी तिघांविरोधात केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.गोकुळ शेषेराव ढाकणे (वय ३२), शेषेराव ढाकणे (वय ६१, दोघेही रा. सारोळा पाटी, ता.



केज) आणि शिवाजी ठोंबरे (वय ३५, रा. वडमाउली दहिफळ, ता. केज) अशी आरोपींची नावे आहेत. आनंद विकास हालकडे (वय १५, रा. विडा, ता. केज) हा १० वीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. परिस्थिती गरिबीची असल्याचा फायदा घेऊन गोकुळ ढाकणे याने त्याला जिलेटीन स्फोट करणाऱ्या ट्रॅक्टरवर कामाला ठेवले. ९ एप्रिल २०२४ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास काम करताना विहिरीमध्ये अचानक स्फोट झाला आणि यात आनंद गंभीर जखमी झाला. त्याचा डाव हात कोपरातून आखडला, एक डोळा कायमचा निकामी झाला, तर दुसऱ्या डोळ्यानेही स्पष्ट दिसत नाही. उजव्या हाताचा अंगठा तुटला, पोटावर, हातावर, तोंडावर, छातीवर गंभीर जखमा झाल्या. त्याला आगोदर बीड आणि नंतर जालना येथील रुग्णालयात दाखल केले. उपचार पान २ वर...

### बाल कल्यान समितीकडून दखल

तत्त्वशील कांबळे यांनी आनंदला बाल कल्याण समितीपुढे हजर केले. त्यानंतर बाल कल्याण समिती अध्यक्ष अशोक तांगडे, सदस्य सुरेश राजहंस, संतोष वारे, छाया गडगे यांच्या कमिटीने मुलाची परिस्थिती पाहून आणि आईचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानंतर केज पोलिसांना पत्र देत गुन्हा दाखल करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

# स्वराती रुग्णालयात रुग्णांची हेळसांड!

**गैरसोय : लोकप्रतिनिधीने लक्ष देण्याची मागणी**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील सरकारी स्वामी रामानंद तीर्थ हॉस्पीटल मध्ये गोरगरीब रुग्णांनाची हेळसांड केली जात आहे स्वामी रामानंद तीर्थ हॉस्पीटल मध्ये ज्या नर्सला पेशंटला काय झाले आहे हे कळत नाही अशा भोगस प्रशिक्षणार्थींना डॉक्टर म्हणून ठेवले आहे ही अतिशय गंभीर बाब बनली आहे तसेच असे प्रशिक्षणार्थींना काही येत नाही आणि त्यांना काही समजले नाही की ते रुग्णांना रुग्णालयात फ`ऱ्या मारायला लावतात.तसेच सोनोग्राफी साठी आलेल्या पेशंटना तर ते सोनोग्राफी करावी लागत असेल तरी सुद्धा ते सोनोग्राफी करायची गरज नाही असे स्वामी



रामानंद तीर्थ हॉस्पीटल येथील रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना ज्या डॉक्टरांना काय झाले आहे हे कळत नाही असे डॉक्टर येणाऱ्या रुग्णांची अरेरावीची भाषा वापरून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना स्वाता डॉक्टरच त्यांना आजार नाही कळला तर रुग्णांनाना दादागिरीची, अरेरावीची भाषा वापरून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना परत पाठवतात.येवढा भोंगळ कारभार स्वामी रामानंद तीर्थ हॉस्पीटल अंबाजोगाई येथील झालेला पान २ वर...